७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# डाटा सुरक्षिततेसाठी ज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील भागीदार संस्थासोबत सामंजस्य करार

## ‘महाचतुर एआय चॅटबॉटमुळे’ कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर मिळणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देणारा ‘महाचतुर एआय चॅटबॉट’ हा महाराष्ट्रासाठी परिवर्तनकारी उपक्रम आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेला हा चॅटबॉट देशातील राज्य शासनाने तयार केलेला अशा प्रकारचा पहिलाच अभिनव उपक्रम आहे. या चॅटबॉटमुळे युवा वर्गाचा शिक्षण ते रोजगार हा प्रवास अधिक सुकर होईल आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ त्वरित उपलब्ध होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या ‘चॅटबॉट’ लोकार्पण व सामंजस्य करार पार पडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, राज्य नाविन्यता सोसायटीचे आयुक्त डॉ.अमित सैनी, व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी, जपानचे वाणिज्यदूत हितोमि साटो, जर्मनीचे वाणिज्य दूत क्रिस्टोफ हेलिअर, कोरियाचे वाणिज्य दूत यो डॉवॉन, फिनलँडचे वाणिज्य दूत इरिक एफ हॉलस्ट्रॉम तसेच विविध उद्योग व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय भागीदार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भारताची ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील असून ही डेमोग्राफिक ॲडव्हांटेज देशाच्या विकासासाठी मोठी संधी आहे. या युवा शक्तीला कौशल्य प्रशिक्षण देऊन अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक असून त्यासाठी केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकासाला प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रातही कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग प्रभावीपणे काम करत असून उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जात आहे. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ हवे आहे आणि तरुणांना रोजगार हवा आहे. या दोघांमध्ये प्रभावी दुवा निर्माण करण्याचे काम ‘महाचतुर चॅटबॉट’ करणार आहे. एआय आधारित ‘चॅटबॉट’ कौशल्य प्रशिक्षण, रोजगार संधी, उद्योजकता मार्गदर्शन, अर्ज प्रक्रिया, असेसमेंट आणि मार्केट लिंकेज अशा सर्व सेवा वन-स्टॉप सोल्युशन म्हणून उपलब्ध करून देणार आहे.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विशेषतः रोजगाराभिमुख युवकांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी हा चॅटबॉट उपयुक्त ठरणार असून व्हॉट्सॲपच्या माध्यमातून तो सर्वांसाठी सहज उपलब्ध असल्याने त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ होईल, सेंटर ऑफ एक्सलन्स, आयटीआय आधुनिकीकरण, महिलांचा कौशल्य उपक्रमात सहभाग वाढविणे, तसेच विविध भागीदारींमुळे कौशल्य क्षेत्राला बळ मिळणार आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था जगातील तिसाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून आगामी काळात अधिक मोठी झेप घेण्यासाठी कौशल्य विकास विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. “महाचतुर हे नाव जितके सुंदर तितकाच हा उपक्रम दूरदृष्टीचा असून महाराष्ट्राला कौशल्य, रोजगार आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात नवी दिशा देणारा ठरेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, राज्यातील असंघटित कौशल्य क्षेत्राला एकत्र आणून महाराष्ट्राच्या प्रगतीला अधिक बळ देण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ उभारण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विभागात अनेक अभिनव योजना व उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो संस्था राज्यात कार्यरत असून, त्या सर्वांना एकत्र आणून कौशल्य विकासाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा विभागाचा संकल्प असल्याचे त्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात काही नोकऱ्यांवर परिणाम होणार असला, तरी त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर नव्या रोजगार संधी निर्माण होणार आहेत. या संधींचे सोने करण्यासाठी कौशल्य विकास विभाग प्रभावीपणे काम करीत असून महाराष्ट्रातील युवा शक्तीला जागतिक रोजगार बाजारपेठेशी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, महाराष्ट्रात कुशल, प्रामाणिक आणि सक्षम मनुष्यबळ उपलब्ध असून जगभरातून या मनुष्यबळाला मागणी आहे. या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देतानाच उद्योगांनाही दर्जेदार मनुष्यबळ मिळेल. राज्यातील आयटीआय, इनोव्हेशन सेंटर्स आणि विविध कौशल्य यंत्रणांचे मोठे नेटवर्क अधिक सक्षम करण्यासाठी विभाग काम करीत असून नावीन्य आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी अनेक नवीन प्रकल्प सुरू करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने शिकाऊ उमेदवारी क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवण्यासाठी आणि रोजगाराभिमुख उमेदवारांचा वेळ वाचण्यासाठी ‘महाचतुर एआय चॅटबॉट’ हा नाविन्यपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म लाँच केला आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## सार्वजनिक आरोग्य विभागासाठी सर्वसमावेशक बदली धोरण लागू

**मुंबई (दै. संध्या)**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक बदली धोरण लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. राज्य शासनाने १५ एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागांतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेस प्राधान्य देण्यात आले आहे. यापूर्वी अस्तित्वात असलेले विविध आदेश व परिपत्रके रद्द करून एकत्रित, स्पष्ट आणि सुसंगत असे नवीन धोरण लागू करण्यात आले आहे. या धोरणानुसार, बदल्या प्रामुख्याने समुपदेशन पद्धतीने करण्यात येणार असून, कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम आणि प्रशासकीय गरज यांचा समतोल साधण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षी एप्रिल-मे महिन्यात सर्वसाधारण बदल्या करण्यात येतील, तर विनंती बदल्या वर्षातून दोन वेळा सप्टेंबर आणि डिसेंबरमध्ये विचारात




घेतल्या जातील. विशेष म्हणजे, एका कार्यालयातील एकूण कर्मचाऱ्यांच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक बदल्या एकाच वेळी होणार नाहीत, याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, दुर्गम व अडचणीच्या भागात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुलभ ठिकाणी बदली देण्यास प्राधान्य दिले जाईल, तर रिक्त पदांचा समतोल राखण्यावरही भर देण्यात येणार आहे. या धोरणात अपंग, गंभीर आजारांनी ग्रस्त कर्मचारी, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण, तसेच शैक्षणिक कारणे अशा विविध मानवी व सामाजिक बाबींनाही प्राधान्यक्रम देण्यात आला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक अडचणी लक्षात घेऊन न्याय्य निर्णय घेण्यास मदत होणार आहे. बदली प्रक्रिया पूर्णतः प्रशासकीय स्वरूपाची असून, कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा बाह्य दबाव आणल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.

## ढिंग-टांग




# पुणे महानगरपालिकेच्या विकास प्रकल्पांचा आढावा



### राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्याच्या नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली पुणे महानगरपालिकेतील विविध विकास प्रकल्पांचा सखोल आढावा घेण्यासाठी आज (दि. २७ एप्रिल २०२६) बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली. या आढावा बैठकीत मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, अमृत योजना, समाविष्ट ११ गावांचा विकास आराखडा, मलनिःसारण व पाणी प्रक्रिया प्रकल्प, रस्ते विकास, प्रधानमंत्री आवास योजना व श्रम साफल्य योजना, पाणीपुरवठा योजना, पावसाळ्यापूर्वीची कामे, नाला सफाई, आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक आराखडा तसेच घनकचरा व्यवस्थापन अशा विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. याशिवाय नव्याने समाविष्ट २३ गावांमधील नागरी सुविधा, शाळा व रुग्णालयांच्या आधुनिकीकरणावरही चर्चा झाली. शहराच्या वाढत्या गरजांचा विचार करून प्रकल्पांना गती देणे, नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक तयारी पूर्ण करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. पुणेकरांना सक्षम पायाभूत सुविधा, सुयोग्य नियोजन आणि स्वच्छ, सुंदर शहर देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या व आगामी प्रकल्पांची सविस्तर माहिती यावेळी मांडण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीला महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांनी माधुरी मिसाळ यांचे स्वागत केले. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विरोधी पक्षनेते निलेश निकम, तसेच विविध पक्षांचे नेते आणि महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत विकासकामांना अधिक वेग, गुणवत्ता आणि परिणामकारकता देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## ब्रेकिंग न्यूज

### नीलम गोऱ्हेंना उमेदवारी देऊ नये

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या 9 जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विधान परिषदेच्या 9 जागांसाठी 12 मे रोजी मतदान होणार आहे. या 9 जागांमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या आमदार नीलम गोऱ्हे यांचा देखील कार्यकाळ संपत आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर पुन्हा शिवसेनेकडून कोणाला संधी मिळणार याबाबत चर्चा सुरु आहे. अशातच शिवसेना पुणे जिल्हा महिला आघाडीनं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहलं आहे. यामध्ये उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पुन्हा विधान परिषदेची उमेदवारी न देण्याची मागणी पत्रातून करण्यात आली आहे. पक्ष संघटनेसाठी नीलम गोऱ्हे यांनी काही केले नसून उलट महिलांचे खच्चीकरण होईल यावर त्यांनी भर दिल्याचा आरोप या पत्रातून करण्यात आला आहे. महिलांचे चरित्र हनन करुन त्यांच्यात भांडणे लावून संघटनेचे मोठे नुकसान केले आहे. नीलम गोऱ्हे या सर्वांना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा आमदार करणार असल्याचा शब्द दिला असल्याचे सांगत आहेत.

### बियाणे उत्पादक कंपनी, वितरक आणि विक्रेत्यांची खरीप हंगामपूर्व राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

# शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध करुन द्यावे

**पुणे (दै. संध्या)**

एल-निनोच्या पार्श्वभूमीवर यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन द्यावे. दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांना बियाण्यांची टंचाई भासणार नाही, यादृष्टीने मुबलक प्रमाणात बियाण्यांची साठवणूक करावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. सर्व बियाणे उत्पादक, वितरक, विक्रेत्यांनी समन्वयाने कामे करावी, या उद्देशाने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले. शिरनामे सभागृह, कृषी महाविद्यालय येथे आयोजित बियाणे उत्पादक कंपनी, वितरक आणि विक्रेत्यांची खरीप हंगामपूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महासंचालक राहुल माहिवाल, राष्ट्रीय सूचना केंद्राचे वरिष्ठ संचालक अविनाश पेडगावकर, संचालक विस्तार व प्रशिक्षण रफीक नाईकवाडी, संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण सुनील बोरकर, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे संचालक अंबादास मिसाळ, कृषी



### कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

उपसंचालक बियाणे व नोडल अधिकारी साथी डॉ. प्रीती सवाईराम, यांच्यासह सियाम, मासा व माफदा बियाणे उत्पादक, विक्रेते संघटनेचे प्रतिनिधी, बियाणे उत्पादक, वितरक आणि विक्रेते उपस्थित होते. ॲड. जयस्वाल म्हणाले, महाराष्ट्र राज्याने देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. त्यामुळे सर्वांनी मिळून विकसित महाराष्ट्र २०४७ च्या संकल्पपूर्तीच्या दृष्टीने काम करावे. बोगस बियाण्यांवर आळा घालून शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे बियाणे उपलब्ध करुन देण्याकरिता साथी पोर्टलचा वापर करावा, असे ॲड. जयस्वाल म्हणाले. श्री. मांढरे म्हणाले, उच्च उत्पादनक्षम वाणांचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे देशाच्या बियाणे उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याकरिता साथी पोर्टल हे महत्वपूर्ण पाऊल असून यामुळे उत्पादक व विक्रेत्यांना कायदेशीर अडचणीच्या वेळी पुरावा म्हणून ते उपयोगी पडणार आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यावर भर द्यावा, असेही श्री. मांढरे म्हणाले. श्री. बोरकर प्रास्ताविकात म्हणाले, केवळ उच्चतम प्रतीच्या बियाण्यांमुळे पीक उत्पादनात २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे व दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाने साथी पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलची अंमलबजावणी खरीप हंगाम २०२३ पासून करण्यात आली आहे. बियाणे उत्पादक व विक्रेत्यांच्या संघटनेच्या सूचनेनुसार पोर्टलमध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात आले असून पोर्टलच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे, असेही श्री. बोरकर म्हणाले. यावेळी डॉ. प्रीती सवाईराम यांनी साथी पोर्टलची उद्दिष्टे, उपयोगिता, पोर्टलमध्ये उत्पादक, विक्रेत्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा आदींबाबत मार्गदर्शन केले. श्री. पेडगावकर यांनी पोर्टलचा वापर करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यात आले. तंत्र अधिकारी अनिल महामुलकर यांनी बियाणे कायद्यातील तरतुदी व बिटी कॉटनबाबत मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते साथी पोर्टल मार्गदर्शक पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

## विद्यार्थ्यांचे शुल्क परत करण्याचे चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे विद्यार्थ्यांची बाजू न्याय्य ठरवत संबंधित महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडून वसूल केलेले शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत. विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पुणे येथील आय,एल,एस, विधि महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांकडून करण्यात आलेल्या बेकायदेशीर शुल्क वसुलीप्रकरणी राज्य शासनाने ही भूमिका घेतली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, पुणे येथील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून अपारदर्शक पद्धतीने व बेकायदेशीर शुल्क आकारणी करण्यात आल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च शिक्षण विभागाने सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समितीची स्थापना करून सखोल चौकशी केली. या चौकशीअंती सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, संबंधित महाविद्यालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ (७) च्या तरतुदींचे उल्लंघन



करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची पूर्वमान्यता न घेता शैक्षणिक वर्ष २०२० – २१, २०२१ – २२ व २०२४ – २५ दरम्यान विद्यार्थ्यांकडून अनधिकृत शुल्क वसूल केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. १७ विविध शीर्षकांखाली एकूण १,०४,८६३/- रुपये इतकी रक्कम बेकायदेशीररित्या वसूल करण्यात आल्याचे आढळून आले आहे. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाद्वारे संबंधित महाविद्यालयास ही रक्कम फी भरल्याच्या दिनांकापासून सहा टक्के व्याजदराने संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

# संपादकीय

## कोविड लॉकडाऊन आणि ‘पर्मनंट ब्रेक’ के बाद काय झालं?

भारतात मुली मन लावून शिक्षण घेतात. उच्चशिक्षणासाठी त्यांना उत्साह असतो. शिक्षणासाठी अनेकींना कराव्या लागणाऱ्या संघर्षातून वाढलेल्या शिक्षणाच्या गोडीशिवाय यामागं भारतीय मुलींचं एक गुपित आहे. ‘लग्न’ हा ज्या संस्कृतीत प्रत्येकासाठी अनिवार्य मुद्दा आहे, तिथं उच्चशिक्षण ही लग्नाचा आवश्यक राक्षस शक्य तितका लांबवण्यासाठीची सोपी युक्ती आहे. शिवाय या लग्नाच्या बाजारात वाटाघाटींसाठी मुलींना मिळणारं महत्त्वाचं भांडवल म्हणजे त्यांचं शिक्षण. त्यामुळं बहुतेक लोक उच्चशिक्षणाकडं पुढील आयुष्यातल्या रोजगारासाठीचं भांडवल म्हणून पाहत असले, तरी शिक्षणाचं मोल मुलींसाठी कितीतरी अधिक असतं. महाविद्यालयं मुलींना स्वतःचा आवाज शोधायची संधी देतात; पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे शिक्षणासाठी होस्टेलला राहणाऱ्या अनेकींना पहिल्यांदाच स्वतःसाठी स्वतंत्र वेळ मिळतो. स्वातंत्र्याची ही निरनिराळी रूपं नव्यानं हाती लागलेल्या जेन-झींच्या उच्चशिक्षणामध्ये लॉकडाऊनचा स्पीडब्रेकर आला आणि ‘ब्रेक के बाद’ घरी गेलेल्या कितीतरी विद्यार्थ्यांसाठी हा शिक्षणातून ‘पर्मनंट ब्रेक’ ठरला. महाविद्यालयं आणि विद्यापीठं बंद होण्याचा तब्बल ३२ कोटी विद्यार्थ्यांवर परिणाम झाला. जसजसे लॉकडाऊनमध्ये महिन्यांमागून महिने जाऊ लागले, तशी बहुतेकांनी शिक्षणासाठी परतण्याची आशा सोडून दिली. अनेक मुलींनी शिक्षणाचा निरोप घेतला आणि या काळात त्यांचा विवाह उरकला गेला. या काळात कितीतरी जणींच्या वाट्याला लगोलग गरोदरपणही आलं. ग्रामीण भागातील आणि विविध परिघांवरच्या समूहांसाठीही लॉकडाऊन हा पर्मनंट ब्रेक ठरला. वाढलेल्या आर्थिक ओझ्याला तोंड देताना अनेक तरुण शिक्षण सोडून पैसे कमवायला लागले. सुरुवातीचा काही काळ सुरू असलेली होस्टेलं बंद झाली, तसं अनेकांसाठी शिक्षण अशक्य झालं. घर ही प्रत्येकासाठी अभ्यास किंवा कामासाठीची जागा असू शकत नाही. कमी जागा आणि इतर अडचणींमुळं अनेकांना एरवीही ‘वर्क फ्रॉम होम’ अवघड असतं. लॉकडाऊन काळात शिक्षण ‘डिजिटल’ झाल्यावर यातल्या अडचणी आणखी वाढल्या. घरात एखादा स्मार्टफोन असला तरी त्यावर अधिकार मुख्यतः कमावत्या पुरुषांचा होता. अनेक मुलं, मुली असलेल्या घरांमध्ये एखाद दुसरा फोन असताना डिजिटल शिक्षणाची संधीच नव्हती. ज्यांच्याकडं डिजिटल शिक्षणासाठी सोयी उपलब्ध होत्या, त्यांनादेखील अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. इंटरनेट कमीअधिक असणं, रेंज जाणं, वीज नसणं याचा सामना करावा लागला. शिकण्या-शिकवण्याच्या अनेक पद्धती या काळात कुचकामी ठरल्या. वर्गात शिकवण्याची सवय असलेल्या शिक्षकांनादेखील या माध्यमातील शिक्षणाशी जुळवून घेण्यासाठी बरेच कष्ट पडले. या काळात विद्यार्थी- शिक्षक यांच्या नात्यातील वाढलेल्या ताणांचे परिणाम आजही दिसत आहेत. ज्यांना ऑनलाइन शिक्षणाची सवय झाली अशा कितीतरी जेन झी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्षात एकाग्रतेने ऐकण्याच्या, समजून घेण्याच्या क्षमतेवर कायमचा परिणाम झाला. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे सार्वजनिक शिक्षणाचं वेगानं खासगीकरण होण्यात लॉकडाऊनचा मोठा हातभार लागला. शिक्षणाची गुणवत्ता आणि सर्वांसाठीची उपलब्धता वेगानं कमी झाली. मोफत, सक्तीचं आणि सर्वांसाठीचं शिक्षण आता लॉकडाऊनच्या ब्रेकनंतर वेगानं आक्रसतं आहे. ते प्रत्येकाच्या वाट्याला असेलच अशी शाश्वती नाही. या बदललेल्या परिस्थितीला लक्षात घेऊन जेन झींच्या आयुष्यातल्या पुढच्या टप्प्यांचा विचार करावा लागेल.

## संस्कृत सुभाषित

आरोग्यं विद्वत्ता सज्जनमैत्री महाकुले जन्म ।
स्वाधीनता च पुंसां महदैश्वर्यं विनाप्यर्थे:।।

अर्थ – आरोग्य, विद्वत्ता, सज्जनाबरोबर मैत्री, चांगल्या कुळात जन्म आणि प्रत्येक गोष्टीत स्वावलंबन या गोष्टी म्हणजे महान ऐश्वर्य आहे.

## गुरु वचन

### सर्वांप्रती समान भाव असावा

एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची मदत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हाथ ठेऊन वरती येत होते. स्वामींच्या या वागणुकीला तेथील साधू–संत चांगले मानत नव्हते. व त्यांनाही काही म्हणू शकत नव्हते.

एकावेळी एका शिष्याने स्वामीजीला विचारले की, आपल्या गंगा स्नानाचा काय फायदा, आपण स्नान करण्यासाठी ब्राह्मण लोकांची मदत घेतात आणि परतताना इतर कोणत्याही जातीच्या व्यक्तीची. यामुळे तर स्नान केल्यानंतरही अपवित्र होते. स्वामीजी शिष्याला म्हणाले, वत्सा हा तुझा भ्रम आहे. स्नानामुळे तर केवळ माझ्या शरीराचा वरील मळ साफ होतो. शरीरातील मळ तर तसाच राहतो आणि तो मळ त्या व्यक्तीसोबत येण्याजाण्याने साफ होतो. ज्याला तू कनिष्ठ जातीचा समजतोस. स्वामीजींचे हे म्हणणे ऐकून शिष्य म्हणाला, मला काही समजले नाही. तेव्हा स्वामीजी म्हणाले, वत्सा मी मानवामानवात अंतर समजत नाही. माझ्यासाठी सर्व जाती–संप्रदाय समान आहेत. मी त्या कनिष्ठ जातींच्या लोकांना जवळ करुन संदेश देऊ इच्छित आहे आणि असे केल्यामुळे मन शुद्ध होते. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे असल्याचा भाव मनात अहंकार निर्माण करतो आणि हा अहंकार मनुष्याच्या प्रगतीचा सर्वात मोठा अडथळा आहे. तोपर्यंत मनाचा अहंकार नष्ट होत नाही. तोपर्यंत मनुष्य कधीही शुद्ध होऊ शकत नाही. कोणी लहान–मोठे नसते तर केवळ मनाचा भाव आपल्याला लहान–मोठा बनवतो आणि लहान–मोठा भेदभाव नष्ट करणे हा माझा उद्देश आहे. स्वामीजीचे हे वचन ऐकून शिष्य त्यांच्या मार्गाने चालू लागला.

## उपदेशकथा

### म्हसोबाचे डोळे

क्रांतिसिंह नाना पाटील आपल्या भाषणातून समाजातील अंधश्रद्धेवर मार्मिक प्रहार करीत असत. विसाव्या शतकातील ग्रामिण महाराष्ट्राचे ते सर्वाधिक लोकप्रिय वक्ते होते. त्यांच्या जीवनातील त्यांनीच भाषणात सांगितलेली ही एक कथा.

नाना एकदा अंकलखोपला गेले होते.अंकलखोपचा म्हसोबा जागृत व जहाल देव मानला जात असे. नानांनी एक गंमत करायचे ठरवले.त्यांनी म्हसोबाचे चांदीचे डोळे काढून आणले. त्याबद्दल म्हसोबा त्यांना काय शिक्षा करतो ते पहायचे होते. पण चार महीने झाले तरी नानांना काहीच होईना. ते पुन्हा एकदा अंकलखोपला गेले. मंदिराच्या पुजाऱ्याला म्हणाले,‘ म्हसोबाचे डोळे चोरणाऱ्यास काय होईल हो दादा?‘ पुजारी म्हणाला,’जुलाब ,रक्तशेंबीची हगवण लागून तो आतापर्यंत मेला देखील असेल. नानांनी खिशातले डोळे काढले व ते पुजाऱ्याला दिले आणि म्हणाले ,‘मीच डोळे नेले होते ,मला काहीच कसे झाले नाही?‘ पुजारी महाहुशार . तो म्हणाला ,मग बरोबर आहे. त्याला डोळेच नाही ,तर तो तुमच्याकडे कसे बघणार?

कथा उपदेश : अंधश्रध्देमुळे ज्यांचा फायदा होतो असे लोक चलाख युक्तीवाद करून अंधश्रध्देचे समर्थन करीत असतात.त्यांच्यापासून सावध रहायला हवे.

## पंचांग

| पंचांग | २२:३५:५५ |
|---|---|
| २८ एप्रिल २०२६ | योग:व्याघात २१:०३:५६ |
| मंगळवार | करण:बव ०६:३१:०१ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव १८:५२:०८ |
| वैशाख शके | सूर्य:मेष |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कन्या०३:३५:३२ |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्काद |
| मास– वैशाख | तारीख – १० |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | पद्मनाथस्वामी बोवासहेब |
| तिथि:द्वादशी १८:५२:०८ | महाराज पुण्यतिथी |
| नक्षत्र:उत्तरा चैत्री | |

## दै.‘संध्या’धमाल सूडोकु क्र. १३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 7 | | | 8 | | 5 | 4 |
| | | | | 1 | | 8 | | 7 |
| 8 | | 6 | | | 7 | | | |
| 4 | | | 1 | | 9 | 6 | 7 | |
| 7 | | 2 | | | | 4 | | 9 |
| | 6 | 5 | 7 | | 3 | | | 1 |
| | | | 4 | | | 1 | | 3 |
| 2 | | 4 | | 3 | | | | |
| 3 | 9 | | 6 | | | 5 | 4 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १३२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 9 | 5 | 3 | 1 | 2 | 7 | 6 |
| 2 | 5 | 7 | 4 | 6 | 9 | 1 | 8 | 3 |
| 6 | 3 | 1 | 8 | 7 | 2 | 5 | 4 | 9 |
| 9 | 6 | 5 | 7 | 2 | 8 | 4 | 3 | 1 |
| 3 | 7 | 2 | 1 | 4 | 5 | 9 | 6 | 8 |
| 1 | 8 | 4 | 6 | 9 | 3 | 7 | 5 | 2 |
| 5 | 9 | 6 | 3 | 1 | 7 | 8 | 2 | 4 |
| 7 | 1 | 3 | 2 | 8 | 4 | 6 | 9 | 5 |
| 4 | 2 | 8 | 9 | 5 | 6 | 3 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११९२ – जेरुसलेमचा राजा कॉन्राड पहिल्याची हत्या.
- १७९६ – चेरास्कोचा तह – नेपोलियन बोनापार्ट व व्हिटोरियो आमेडेओ तिसरा, सार्डिनीयाचा राजा यांच्यात.
- १९२० – अझरबैजानचा सोवियेत संघात प्रवेश.
- १९४५ – इटलीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी बेनितो मुसोलिनीचा वध केला.
- १९४७ – पाच मदतनीसांसह थॉर हायरडाल पेरूच्या किनाऱ्यावरुन पॉलिनेशियाकडे कॉन–टिकी नावाच्या तराफ्यावर निघाला.
- १९५२ – डाइट डी. आयझेनहॉवरने नाटोचे सरसेनापतीपद सोडले.

### राष्ट्रीय

- २००६ – दिल्लीत तीन वेगवेगळ्या ठिकाणी लागलेल्या आगीत दोन मुले मृत्यूमुखी पडले व सुमारे तीनशे झोपड्या जळून खाक झाल्या.
- २००७ – सरकारने वैयक्तिक आयकर रिटर्न भरण्यासाठी ‘सरल‘च्या जागी नवा आयटीआर–एक फार्म जारी केले.

### जन्म

- १४४२ – एडवर्ड चौथा, ईंग्लंडचा राजा.
- १७५८ – जेम्स मन्रो, अमेरिकेचा ५वा राष्ट्राध्यक्ष.
- १८८९ – अँतोनियो दि ऑलिव्हियेरा सालाझार, पोर्तुगालचा हुकुमशहा.
- १९०८ – ऑस्कार शिंडलर, ऑस्ट्रियाचा व्यापारी व नाझीविरोधी.
- १९२४ – केनेथ कॉंडा, झाम्बियाचा राष्ट्राध्यक्ष.

### निधन

- १७२६ – थॉमस पिट, चेन्नईचा ब्रिटीश गव्हर्नर.
- १९४५ – बेनितो मुसोलिनी, इटलीचा हुकुमशहा.
- १९७८ – मोहम्मद दाउद खान, अफगाणिस्तानचा राष्ट्राध्यक्ष.

## : SMS :

Aadmi shaadi kyon karta hai? Takee vo marne ke baad agar Swarg jaye to achcha feel kare aur agar Nark jaye to homely feel kare...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.१ | २८.७ |
| अहमदनगर | ३८.६ | २८.४ |
| अकोला | ४३.३ | ३० |
| अमरावती | ४२.६ | ३०.५ |
| बीड | ४४.९ | ३०.९ |
| भंडारा | ४५.९ | २९.१ |
| बुलढाणा | ४०.२ | २७.५ |
| चंद्रपूर | ४८.१ | ३१.१ |
| चेन्नई | ४४.३ | २६.१ |
| नवी दिल्ली | ४०.१ | २९.३ |
| धुळे | ४०.६ | २८.९ |
| गोंदिया | ४३.९ | २८.५ |
| जळगाव | ४३.४ | २९.९ |
| कोल्हापूर | ४०.९ | २४.६ |
| लातूर | ३८.४ | २८.३ |
| मुंबई | ४१.६ | ३२.७ |
| नागपूर | ४३ | २९.९ |
| नांदेड | ४२.२ | ३०.४ |
| नंदूरबार | ४०.८ | २९.३ |
| नाशिक | ३८.३ | २६.७ |
| पुणे | ३६.८ | २६.८ |
| पंढरपूर | ३९.८ | २९.५ |
| सातारा | ३८.४ | २५.२ |
| सांगली | ४०.१ | २६.२ |
| सोलापूर | ४०.५ | ३१.३ |
| वर्धा | ४३.६ | ३०.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष** : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील.

**तुळ** : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही.

**वृषभ** : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल.

**मिथुन** : शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: दक्षिण श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे.

**धनु** : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल.

**कर्क** : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पश्चिम आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो.

**मकर** : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.


**सिंह** : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील.

**कुंभ** : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील.

**कन्या** : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: दक्षिण कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील.

**मीन** : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. बढती मिळण्याचे योग आहे. वाद विवाद करू नका.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १३३



### आडवे शब्द

१. पती–पत्नी
५. उपकरण, साहित्य इ.
९. कापडाची विण
११. मोटार
१२. नवरा
१३. यज्ञ
१५. तोफगाडी
१८. गणितातील उणे
२१. श्रीकृष्णाच्या वडिलांचे व आईचे नाव
२३. सोन्याचांदीचा धागा
२४. सीतेचे वडील
२६. अंगावरील बारीक केस
२८. प्रामाणिक, सोज्वळ
३०. भीती
३२. वंदन, अभिवादन
३५. लोकांचा घेराव
३७. खाटीक
३८. पाचोळा
४०. अस्थिर, हलणारे
४२. प्रेम, ममता
४३. स्त्री, महिला
४४. गवताचे रुंद पान
४५. श्वसनाचा अवयव
४६. जमीन
४७. बगीचा
४९. देवीचा उत्सव
५०. रांजण
५२. पोरका
५४. पाहुणचाराची सुरुवात
५६. पावसाची झड
५८. केर
५९. तळहात
६३. दडणे
६५. जन्ममरण
६६अ. कमतरता, चणचण
६८. सुताराचे हत्यार
७०. कलगीतुरा
७२. फळांचे पेय
७४. संताप, राग
७५. मुंबईतील एक उपनगर
७६. साव भरतो, चोर बुडवतो
७७. प्रतिष्ठा, वट
७८. रोग झालेला, रुग्ण
७९. आवाज, गोंगाट
८०. पराभव, नाश
८१. अखंड सूतकताईसारखी सततची बडबड

### उभे शब्द

१. होकारच्या विरुद्ध
२. डाळीचे कालवण
३. बाक
४. गवत उपटण्याचे साधन
५. चीजवस्तू
६. द्रव्य
७. सावली (हिंदी)
८. नंतर
१०. तंबाखूचे सुगंधी चूर्ण
१४. राजपुत्राचे वडील
१६. गवई
१७. चहाबरोबरचा ’साहेबी’ नाश्ता
१८. अशीलाची बाजू मांडणारा
१९. खाट, पलंग
२०. मनाला लागलेली टोचणी
२२. व्रत
२४. वजनदार
२५. तीव्र वेदना
२७. जंगलाचा सांभाळ करणारा सरकारी अधिकारी
२९. सर्वत्र
३१. ’सबका मालिक एक’ हा संदेश देणारे संत
३३. तर्रीदार भाजी
३४. रड्या माणूस
३६. रात्र
३९. संगोपन
४१. मज्जाव, हरकत
४४. चौथा हिस्सा
४८. हत्तींचा प्रमुख
५१. ढीग
५२. कमी बोलणारा
५३. दमणे
५५. गोळीबाराचा आवाज
५७. अनिच्छेने, कसेतरी
५९. कराचे ओझे
६०. वाळवंट
६१. गाण्यातील तान
६२. सहाय्य
६४. अनुमती
६६. बळी देण्याची अमानूष प्रथा
६७. आतापर्यंत
६८. कापून ठेवलेले तुकडे
६९. राबता
७१. विहीरीचा एक प्रकार
७२. रंग बदलणारा प्राणी
७३. बगळा
७४. टाळाबरोबरचे वाद्य

### जम्बो शब्दकोडे क्र. १३२ चे उत्तर

आडवे उत्तर १.सोनाराने कान टोचणे ९.टाकोटाक १२.दार १३.हळहळणे १४.पावसाळा १५.चर १६.मामी १७.फुटकळ १९.टाक २१.रक्षक २३.छटा २४.जवळपास २७.डहाळी २९.सावध ३०.सनई ३२.भाग्य ३३.कमळ ३५.नवजीवन ३८.नाका ३९.नाल ४१.चोक ४२.तर ४३.सुरत ४४.भाव ४५.पाटील ४६.गाजर ४८.दाम ५०.वादंग ५१.नजरानजर ५४.आड ५५.खरीखुरी ५७.धनी ५८.लवाद ६०.भेदरट ६२.अलगद ६३.मदद ६६.वाचा ६७.रमणीय ६८.सवालजवाब ७०.कण ७१.नीरमोर ७३.दमा ७४.जयजयकार ७६.वामा ७७.हालहवाल ७८.पदरमोड

उभे उत्तर : १.सोदाहरण २.नार ३.नेहमी ४.काळ ५.नहर ६.टोळ ७.चणेफुटाणे ८.जवळजवळ ९.टाळाटाळ १०.टाच ११.करडा १४.पाक १६.माकड १८.टक २०.कपास २२.माळी २५.वध २६.सनसनाटी २८.हारजीत २९.अमला ३१.जनकजननी ३२.भान ३४.बोका ३६.वरदान ३७.धीर ३८.नाव ४०.ललकारी ४१.चोखा ४४.भाग ४५.पायरी ४७.राज ४९.मजलदरमजल ५०अ.दंडभेद ५२.राम–लक्ष्मण ५३.रवा ५५.खट ५६.खुजा ५७.धन्यवाद ५९.दमणी ६१.रविवार ६४.दयनीय ६५.राजकुमार ६८.समोर ६९.बडबड ७०.कमाल ७२.रकाना ७३.दहा ७५.जग ७६.वाद

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# ASUS कडून 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' सादर; व्यावसायिक संगणक मालिकेचा मोठा विस्तार




पुणे (दै. संध्या)

ASUS या जागतिक तंत्रज्ञान कंपनीने व्यावसायिक वापरासाठी अत्याधुनिक वैशिष्ट्यांनी सज्ज 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' या नवीन संगणकाचे सादरीकरण केले. यासोबतच 'एक्स्पर्टबुक पी' मालिकेचा विस्तार करत 'पी३' आणि 'पी५' ही नवी रूपेही सादर करण्यात आली आहेत. कंपनीच्या मते, 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' हा अत्यंत हलका, उच्च कार्यक्षमतेचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कामगिरी देणारा अग्रगण्य संगणक आहे. वरिष्ठ अधिकारी, उद्योग नेते आणि व्यावसायिक वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन याची रचना करण्यात आली आहे. अत्याधुनिक रचना, आकर्षक पडदा, प्रभावी ध्वनी व्यवस्था, दिवसभर टिकणारी बॅटरी आणि उच्च दर्जाची सुरक्षितता यामुळे हा संगणक विशेष ठरतो. हा संगणक विशेष मिश्रधातूपासून तयार करण्यात आला असून तो अत्यंत हलका आणि मजबूत आहे. सुमारे एक किलोपेक्षा कमी वजन, उच्च कार्यक्षम प्रक्रिया यंत्रणा, जलद स्मृती आणि मोठ्या क्षमतेची साठवण यामुळे तो वेगवान आणि सक्षम ठरतो. यामध्ये उच्च दर्जाचा दृश्य पडदा, उत्कृष्ट ध्वनी प्रणाली आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी देण्यात आली आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, या संगणकात सुरक्षिततेवर विशेष भर देण्यात आला असून, बहुपातळी संरक्षक यंत्रणा उपलब्ध आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील माहिती सुरक्षित ठेवण्यास मदत होते.

'एक्स्पर्टबुक पी' मालिकेचा विस्तार करत सादर करण्यात आलेली 'पी३' आणि 'पी५' ही रूपे विविध आकारांच्या उद्योगांसाठी उपयुक्त ठरणार आहेत. या संगणकांमध्ये उच्च कार्यक्षमता, वाढवता येणारी क्षमता आणि विविध संरचना पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे वाढत्या उद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे संगणक उपयुक्त ठरतील.

या सर्व संगणकांमध्ये टिकाऊपणा, सुरक्षितता, सुलभ जोडणी आणि सहज वाहून नेता येण्याची क्षमता यांचा समतोल साधण्यात आला आहे. देशभर उपलब्ध सेवा जाळ्याच्या मदतीने वापरकर्त्यांना तांत्रिक सहाय्य देण्याची सोयही कंपनीने उपलब्ध करून दिली आहे.

या निमित्ताने कंपनीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी सॅमसन हू यांनी सांगितले की, बदलत्या व्यावसायिक वातावरणात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कामकाज अधिक परिणामकारक करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. भारतातील वाढत्या उद्योगक्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन ही नवी उत्पादने सादर करण्यात आली आहेत.

तसेच संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य संस्था Intel इंडियाचे वरिष्ठ अधिकारी पी. पी. सुनील आचार्य यांनी सांगितले की, या नव्या संगणकांमुळे व्यावसायिकांना अधिक वेगवान, सक्षम आणि बुद्धिमान साधन उपलब्ध होईल.

'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' या संगणकाची प्रारंभिक किंमत सुमारे दोन लाख एकोणचाळीस हजार नऊशे नव्वद रुपये असून तो नामांकित ऑनलाईन विक्री मंचावर पूर्वनोंदणीसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

'पी३' मालिकेची किंमत सुमारे पंच्याण्णव हजार रुपयांपासून सुरू होत असून 'पी५' मालिका लवकरच सुमारे दोन लाख चौदा हजार रुपयांच्या प्रारंभिक किमतीत उपलब्ध होणार आहे.

नव्या उत्पादनांच्या सादरीकरणानिमित्त ग्राहकांना मर्यादित कालावधीसाठी विस्तारित हमी, बॅटरी संरक्षण, अपघाती नुकसान संरक्षण, सवलती आणि इतर आकर्षक सुविधा देण्यात येणार असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे.

एकूणच, व्यावसायिक वापरासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि कार्यक्षमता यांचा संगम साधणारी ही नवी संगणक मालिका उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मद्यधुंद वाहनचालकांवर कारवाईचा बडगा; 3 दिवसांत 171 जणांवर कारवाई

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर वाहतूक विभागाने मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवली. २४ ते २६ एप्रिलदरम्यान तीन दिवस चाललेल्या या मोहिमेत तब्बल १७१ मद्यधुंद वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. वाहतूक विभागाने शहरातील विविध ठिकाणी एकूण ३३ नाकाबंदी पॉइंट उभारून वाहनांची तपासणी केली. या ठिकाणी ब्रेथ ॲनालायझरच्या साहाय्याने चालकांची तपासणी केली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाईसह पुढील कायदेशीर प्रक्रियादेखील केली. या कारवाईचा मुख्य उद्देश म्हणजे शहरातील अपघातांचे प्रमाण कमी करणे, रस्ते सुरक्षितता वाढवणे आणि नागरिकांमध्ये जबाबदार वाहनचालकाची जाणीव निर्माण करणे हा आहे. तसेच, मद्यपान करून वाहन चालवणे टाळावे, कारण यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. सर्वांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून स्वतःचा व इतरांचा जीव सुरक्षित ठेवावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे उपायुक्त हिम्मत जाधव यांनी केले आहे.

### Medtronic कडून पार्किन्सनग्रस्तांसाठी प्रगत मेंदू उद्दीपन प्रणालीचे सादरीकरण

पुणे (दैनिक संध्या) : Medtronic या आरोग्यसेवा तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने भारतात पार्किन्सन आजाराने ग्रस्त रुग्णांसाठी प्रगत मेंदू उद्दीपन प्रणालीचे सादरीकरण केले आहे. ही प्रणाली विद्यमान उपचार पद्धतीतील एक महत्त्वपूर्ण सुधारणा मानली जात असून रुग्णांचे जीवनमान उंचावण्यावर याचा भर आहे. पार्किन्सन हा मज्जासंस्थेशी संबंधित प्रगत आजार असून तो व्यक्तीच्या हालचालींवर आणि दैनंदिन जीवनावर परिणाम करतो. काळानुसार चालणे, लिहिणे किंवा वस्तू पकडणे यांसारख्या कृती कठीण होत जातात. याशिवाय संवाद, झोप आणि एकूण आरोग्यावरही या आजाराचा परिणाम दिसून येतो. सध्या उपलब्ध मेंदू उद्दीपन उपचार पद्धतीमध्ये दिवसभरात उद्दीपनाची पातळी हाताने बदलावी लागते. मात्र नव्या प्रणालीमध्ये रुग्णाच्या प्रकृतीनुसार आणि मेंदूतील संकेतांनुसार आपोआप बदल होतात. त्यामुळे लक्षणांवर अधिक सातत्यपूर्ण नियंत्रण मिळते, दुष्परिणाम कमी होतात आणि यंत्रणेतील ऊर्जेचा वापर अधिक कार्यक्षम होतो. या प्रणालीमध्ये मेंदूतील संकेत ओळखणारे प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले असून त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त झाली आहे. मेंदूतील हालचालींवर नियंत्रण ठेवणाऱ्या भागाला सूक्ष्म विद्युत संकेत पाठवून लक्षणे कमी करण्याचे काम ही यंत्रणा करते. भारतात पार्किन्सनग्रस्त रुग्णांची संख्या वाढत असून आगामी काळात ती मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा वेळी या प्रगत उपचार प्रणालीचे सादरीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. जरी या आजारावर संपूर्ण उपचार उपलब्ध नसले तरी मेंदू उद्दीपन उपचार पद्धतीमुळे गेल्या अनेक वर्षांत रुग्णांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा झाली आहे.


### सुट्टीच्या हंगामामुळे रेल्वे गाड्या 'हाऊसफुल्ल'; 577 विशेष रेल्वेगाड्या

पुणे (दैनिक संध्या) : शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असल्यामुळे गावी जाणाऱ्या प्रवासीसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावर गर्दी होत आहे. शिवाय प्रमुख गाड्यांचे तिकीट जूनपर्यंत फुल्ल झाले आहेत. परिणामी, ऐनवेळी सुट्टीच्या हंगामात प्रवासाचे बेत आखणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे; परंतु उन्हाळ्यात रेल्वेला वाढणारी प्रवाशांची गर्दी विचारात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून काही मार्गांवर विशेष गाड्या सोडण्यात आल्या आहेत. तरीही वाढत्या प्रवाशांमुळे रेल्वेगाड्यांसह स्थानक परिसरही 'हाऊसफुल्ल' झाला आहे. पुणे शहर हे उद्योग, शिक्षण तसेच ऐतिहासिक ठिकाण असल्याने येथे पर्यटकांची मोठी लगबग असते. बाहेरील राज्यातून कामानिमित्त व नोकरीसाठी पुण्यात ये-जा करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे पुणे स्थानकावरून दररोज किमान दीड ते दोन लाख नागरिक प्रवास करतात. परिणामी, एस. टी. बससह रेल्वे प्रवासाला अधिक प्राधान्य देण्यात येत असल्याने येथून तिरूपतीसह मुंबई, दिल्ली, दानापूर, कोलकाता, चेन्नई, गोरखपूर, आदी महत्त्वपूर्ण शहरांत रेल्वेसेवा सर्व प्रवाशांसाठी किफायतशीर आहे. सध्या बारावी, दहावीसह शाळांच्या परीक्षा संपल्या आहेत. त्यामुळे उन्हाळी सुट्टीत बाहेर फिरायला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. परिणामी रेल्वेस्थानकावर प्रचंड गर्दी होत आहे. पुण्यातून उत्तरेकडे धावणाऱ्या जम्मू-तावी झेलम एक्स्प्रेस, दानापूर एक्स्प्रेस, आझाद हिंद एक्स्प्रेस, गोरखपूर एक्स्प्रेस, दुरांतो एक्स्प्रेस, बनारस एक्स्प्रेस आणि सात्रांगाची या सर्व गाड्यांना जूनपर्यंत शंभर ते दोनशेपर्यंत वेटिंग आहे; तर मुंबईतून सुटणाऱ्या व दक्षिणेकडे जाणाऱ्या कन्याकुमारी एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक एक्स्प्रेस, सीएसएमटी-चेन्नई एक्स्प्रेस आणि त्रिवेंद्रम एक्स्प्रेस या प्रमुख गाड्यांना साधारणपणे ३० मेपर्यंत तिकीट फुल्ल आहे.

## बुधवार पेठेत कुंटणखान्यांवर पोलिसांची कारवाई

**४ फ्लॅट सील, ३ बांगलादेशी महिलांना अटक**

पुणे (दै. संध्या)




शहरातील बुधवार पेठ भागातील कुंटणखान्यांवर फरासखाना पोलिसांनी मोठी कारवाई करत चार फ्लॅट एक वर्षासाठी सील केले असून, अनधिकृतपणे भारतात वास्तव्य करणाऱ्या तीन बांगलादेशीमहिलांना ताब्यात घेतले आहे. फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक 96/2024 अन्वये भारतीय न्याय संहिता तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. तपासादरम्यान बुधवार पेठेतील 'बेगम बिल्डिंग', 'न्यू वेलकम बिल्डिंग' तसेच दाणे आळी परिसरातील काही ठिकाणी कुंटणखाने चालवले जात असल्याचे निष्पन्न झाले. यावरून पोलिसांनी संबंधित चार फ्लॅट सील करण्याचा प्रस्ताव पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे पाठविला होता. त्यानुसार अधिकारांचा वापर करून संबंधित चार फ्लॅट एक वर्षासाठी सीलबंद करण्यात आले. दरम्यान, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) कृषिकेश रावले यांच्या सूचनेनुसार रेड लाईट एरियामध्ये बांगलादेशी नागरिकांचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बुधवार पेठ परिसरात सापळा रचून कारवाई केली. यावेळी जोशना शकुर अली, कुलसुम खातून आणि अंजुरा बेगम (सर्व रा. बांगलादेश) या तीन महिलांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत या महिला मागील एक महिन्यापासून भारतात बेकायदेशीररित्या वास्तव्यास असून बुधवार पेठेत वेश्याव्यवसाय करत असल्याची माहिती समोर आली. त्यांच्याकडून बांगलादेशी असल्याचे पुरावे मिळाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## काही माणसं मार्ग बदलतात; तर काही मार्ग माणसं बदलतात!

पुणे (दै. संध्या)

माणसाचं आयुष्य म्हणजे सरळ रेषेतली वाट नसते. ती वळणांनी, चढ-उतारांनी, काटेरी वळचणींनी भरलेली असते. कुणी त्या वाटेवर चालताना स्वतःचा मार्ग बदलतो; तर कुणाचं संपूर्ण व्यक्तिमत्त्वच त्या मार्गामुळे बदलून जातं. म्हणूनच जीवनाचं एक कटू पण खरं सत्य असं सांगतं, काही माणसं मार्ग बदलतात; तर काही मार्ग माणसं बदलतात. हा फरक समजून घेतला, तर माणसाचं आयुष्यही समजायला लागतं. काही माणसं परिस्थितीवर मात करतात. संकट आलं, अडथळे आले, अपयश आलं तरी ते थांबत नाहीत. ते विचार करतात, आत्मपरीक्षण करतात आणि म्हणतात, हा मार्ग माझ्यासाठी योग्य नाही; मला दुसरी वाट शोधायची आहे. ही माणसं पळपुटी नसतात; ती प्रगल्भ असतात. कारण मार्ग बदलणं म्हणजे हार मानणं नव्हे, तर स्वतःला वाचवणं असतं. स्वतःच्या मूल्यांशी, स्वप्नांशी आणि अंतःकरणाशी प्रामाणिक राहण्यासाठी घेतलेला तो एक धाडसी निर्णय असतो.

इतिहासात अशी असंख्य उदाहरणं आहेत. अपयशातून उभे राहिलेले उद्योजक, अन्यायाला कंटाळून व्यवस्थेविरुद्ध उभे ठाकलेले समाजसुधारक, चुकीच्या वाटेवरून परत फिरलेले सामान्य माणूस या सगळ्यांनी मार्ग बदलला; पण स्वतःला हरवू दिलं नाही. पण प्रत्येकाला मार्ग बदलता येतोच असं नाही. सगळ्यांकडे पर्याय नसतात. सगळ्यांकडे बळ नसतं. सगळ्यांकडे पाठिंबा नसतो. मग काही माणसं मार्ग बदलत नाहीत; मार्गच त्यांना बदलून टाकतो. दारिद्र्य, बेरोजगारी, सामाजिक अन्याय, कौटुंबिक जबाबदाऱ्या, व्यसन, सत्ता, पैसा हे सगळे मार्ग माणसाच्या आयुष्यावर आपला ठसा उमटवतात. एक संवेदनशील माणूस हळूहळू कठोर होतो. एक प्रामाणिक माणूस तडजोडी शिकतो. एक आदर्शवादी माणूस वास्तववादी बनतो, कधी कधी तर निराशावादीही. हा बदल नेहमी स्वेच्छेने होत नाही; तो अनेकदा परिस्थितीने लादलेला असतो. मार्ग माणसाला कधी मोडतो, तर कधी घडवतो. प्रत्येक मार्ग वाईट नसतो. काही मार्ग माणसाला मजबूत करतात.




संघर्षाची वाट चाललेला माणूस सहनशील होतो. अपमान सहन केलेला माणूस संवेदनशील होतो. कठीण परिस्थितीत तग धरलेला माणूस नेतृत्व शिकतो पण काही मार्ग माणसाला आतून तोडतात. निरंतर अपमान, अन्याय, उपेक्षा, असुरक्षितता यामुळे माणूस स्वतःवरच विश्वास ठेवणं सोडतो. मग तो जगण्यासाठी बदलतो; पण तो बदल त्याचा नसतो, तर तो लादलेला असतो. आजचा समाज कोणते मार्ग तयार करतोय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आजचा समाज माणसाला कोणत्या वाटेवर ढकलतो आहे? स्पर्धेची वाट, जिथे माणूस माणसाचा प्रतिस्पर्धी आहे. स्वार्थाची वाट, जिथे "मी" केंद्रस्थानी आहे. दिखाव्याची वाट, जिथे सत्यापेक्षा प्रतिमा महत्त्वाची आहे. तडजोडीची वाट, जिथे मूल्यांपेक्षा सोयी जड ठरतात. या वाटांवर चालताना अनेक माणसं नकळत बदलून जातात. ते स्वतःला ओळखू शकत नाहीत. आरशात दिसणारा चेहरा त्यांचाच असतो; पण आतला माणूस कुठेतरी मागे पडलेला असतो.

> आयुष्याच्या वाटेवर चालताना सगळ्यांनाच वळणं येतात. कोणी त्या वळणावर दिशा बदलतो, तर कोणी तिथेच स्वतः बदलून जातो. पण ज्यांनी स्वतःची ओळख जपली, मूल्यांना धरून ठेवलं आणि गरज पडल्यावर मार्ग बदलण्याचं धैर्य केलं, तेच खऱ्या अर्थाने जिंकतात. कारण शेवटी एवढंच खरं आहे की, मार्ग सगळ्यांनाच बदलतो; पण स्वतःला हरवू न देता मार्ग बदलणं, हीच खरी माणूसपणाची कसोटी आहे.

> मार्ग बदलणं ही ताकद आहे, कमकुवतपणा नाही. समाज अनेकदा मार्ग बदलणाऱ्याला दोष देतो. "स्थिर नाही," "कायम बदलतो," "टिकाव नाही" अशी लेबले लावली जातात पण सत्य असं आहे की चुकीच्या मार्गावर ठाम राहणं हे धैर्य नाही; ते हट्ट आहे. वेळीच वळण न घेणं म्हणजे अपघाताला आमंत्रण देणं. मार्ग बदलणं म्हणजे स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी स्वीकारणं. ते धाडस सगळ्यांकडे नसतं. शेवटी प्रश्न मार्गाचा नाही, माणसाचा आहे. मार्ग बदलणं की मार्गाने बदलणं हा शेवटी निवडीचा प्रश्न आहे. माणूस जागरूक असेल, आत्मभान जपेल, प्रश्न विचारेल, तर तो मार्ग बदलू शकतो. पण जर तो गप्प राहिला, सवयींचा गुलाम झाला, तर मार्ग त्याला बदलतो कधी नकळत, कधी निर्दयपणे. म्हणूनच प्रत्येक वळणावर थांबून स्वतःला विचारणं गरजेचं आहे. हा मार्ग मला घडवतोय की मोडतोय? मी बदलतोय कारण मला वाढायचं आहे, की कारण मला तग धरायचा आहे?

## प्रवाशांना मिळणार सुखद प्रवासाचा नवा अनुभव

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्राची जीवनवाहिनी 'लालपरी' आता नव्या रूपात आणि नव्या उत्साहात प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांशी असलेले नाते अधिक घट्ट करण्यासाठी 'आपली बस, आपली सेवा' हे अभियान १ मे २०२६ पासून संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या उपक्रमाची घोषणा केली असून, प्रवाशांचा विश्वास पुन्हा संपादन करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. एसटीच्या ताफ्यात बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासी संख्या आणि महसुलात अपेक्षित वाढ झालेली नाही. ही बाब लक्षात घेऊन महामंडळाने आता केवळ सेवा न देता, तिला 'मानवी स्पर्श' देण्याचे ठरवले आहे. या अभियानांतर्गत एसटीचे चालक आणि वाहक केवळ कर्मचारी न राहता 'सेवक' म्हणून प्रवाशांच्या मदतीला धावतील. प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी चालक स्वतःची ओळख करून देतील आणि प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, प्रमुख थांबे आणि पोहोचण्याची वेळ याबद्दल माहिती देतील. 'आपली बस, आपली सेवा' हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रवाशांनीही 'सहप्रवासी' म्हणून साथ द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बसमध्ये स्वच्छता राखणे, ऑनलाइन आरक्षणाचा आणि 'एनसीएमसी' स्मार्ट कार्डचा जास्तीत जास्त वापर करणे, तसेच आपल्या सामानाची जबाबदारी घेणे, यांसारख्या सवयींमुळे प्रवास अधिक सुखकर होईल, असे महामंडळाने म्हटले आहे. अनेकदा तांत्रिक बिघाड किंवा अन्य कारणांमुळे बस रद्द होते. अशावेळी प्रवाशांचे हाल होऊ नयेत म्हणून तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच, प्रवाशांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक स्वतंत्र आणि तत्पर यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे.

## पुण्यात घरफोडीच्या ४ प्रकरणांमध्ये ६ लाखांचा ऐवज लंपास

पुणे (दै. संध्या)

घरफोडीच्या वेगवेगळ्या चार प्रकरणांमध्ये चोरांनी ५ लाख ९४ हजार ४७९ रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. धायरी येथील ३८ वर्षीय तक्रारदाराने नऱ्हे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून चोरांनी १ लाख ४९ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचेदागिने लांबवले. हा प्रकार शनिवारी (दि. २५) घडला. याप्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पवार करत आहेत. दुसऱ्या घटनेत उरूळी देवाची येथील ५२ वर्षीय तक्रारदाराने फुरसुंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शनिवारी (दि. २५) सकाळी १० ते संध्याकाळी सव्वापाच या वेळेत ते घरात नसल्याची संधी साधत चोरांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर लोखंडी कपाटातील तिजोरी उचकटून २ लाख ४ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचेदागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला.

## महावितरणचा मोठा निर्णय; आता सकाळी ७ ते ११ बत्तीगुल?



पुणे (दै. संध्या)

उन्हाच्या तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीची पूर्वनियोजित कामे त्या-त्या दिवशी सकाळीच सात ते ११ वाजताच्या दरम्यान करण्याचा निर्णय महावितरणकडून घेण्यात आला आहे. आता देखभाल-दुरूस्तीसाठी फक्त सकाळी सात ते ११ वाजेदरम्यानच वीजपुरवठा खंडीत करण्यात येणार आहे.

उन्हाळ्यातील विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेची देखभाल-दुरुस्ती करण्यात येते. या कामांचे नियोजन पावसाळ्यापूर्वीच केले जाते. देखभाल-दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या अखेरीस पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असते. त्यानुसार सध्या सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल आणि दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

या कालावधीत वीजपुरवठा बंद करण्यात येत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होत असून, मोठी गैरसौय होत असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या. ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी सात ते ११ वाजेदरम्यानच करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहेत.

राज्यातील वीजयंत्रणेच्या देखभाल-दुरूस्तीच्या वेग देण्यात आला असून, ही कामे सकाळी लवकरच करण्याचे निर्देश महावितरण मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.

पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून, पावसामुळे वीजपुरवठा खंडित होणे आणि वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल-दुरूस्तीची कामे करण्यात येत असल्याचे महावितरणकडून कळविण्यात आले.

उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, बॅटरी चार्जिंग, पॉवर ट्रान्सफॉर्मरची देखभाल आणि ऑइल टॉपिंग अप या कामांसह वीजपुरवठ्याच्या पर्यायी यंत्रणा सज्ज करणे आदी कामे करण्यात येत असल्याचे महावितरणकडून कळविण्यात आले.

### पूर्वसूचना देण्यात येणार

महावितरणच्या देखभाल दुरुस्तीची पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे आणि संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे व प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळवण्यात येणार असल्याचेही महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले.

### देखभाल-दुरूस्तीत या कामांचा समावेश

- झाडांच्या छोट्या फांद्या तोडणे
- तूटलेले पीन आणि डिस्क इन्सूलेटर्स बदलणे
- वितरण रोहित्रे, फिडर पिलर, रिंगमेन युनिटचे अर्थिंग तपासणे
- ऑइल फिल्टरेशन आणि ऑइल टॉपिंग अप
- रोहित्राच्या वितरण पेटीची दुरुस्ती
- नादुरुस्त लाईटनिंग अरेस्टर बदलणे
- वीजखांब आणि तारांचे मजबुतीकरण
- तारांमधील झोल काढणे, जुन्या वीजतारा बदलणे
- गंजलेले किंवा खराब झालेले वीजखांब बदलणे
- फिडर पिलरची साफसफाई आणि आवश्यकतेनुसार इन्सूलेशन स्प्रे मारणे,
- उच्च आणि लघुदाब वीजवाहिन्यांना गार्डिंग करणे

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कलम 37 (1) व (3) आदेश जारी

पुणे (दैनिक संध्या) : पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 29 एप्रिल 2026 रोजी 00.01 पासून ते 12 मे 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे. कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किंवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढा-यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे. वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे व त्याबबात परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

### पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी प्रसिद्ध

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २८ डिसेंबर २०२६ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची निवडयादी व गुणयादी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://mecenmms.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिष्यवृत्ती योजना परीक्षेची (एनएमएमएस) विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांची यादी २४ फेब्रुवारी रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना, पालकांना शाळेमार्फत जात, दिव्यांगत्व जन्म दिनांक आदी बाबतची दुरुस्ती असल्यास परिषदेकडे ऑनलाईन पाठविणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी, पालकांनी शाळेमार्फत पाठविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी २ लाख ५० हजार ७४५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यासाठी ११ हजार ६८२ शिष्यवृत्ती कोटा शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून निश्चित केलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या आरक्षणानुसार संबंधित संवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते, तसेच संबंधित संवर्गात दिव्यांगांसाठी ४ टक्के आरक्षण समाविष्ट आहे. सर्व जिल्ह्यांसाठी स्वतंत्रपणे ७ वी व ८ वीची विद्यार्थी संख्या व १२ ते १४ वयोगटातील संख्येच्या आधारे जिल्हानिहाय कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. परीक्षेचा निकाल व निवडयादी फक्त परिषदेच्या संकेतस्थळावरच उपलब्ध करुन दिली जाते. जिल्ह्यांनी, शाळांनी व विद्यार्थ्यांनी सदरचा निकाल परिषदेच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा. शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वितरणाचे काम शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी (योजना) व शिक्षण संचालक (योजना) यांच्यामार्फत केले जाते, असे आयुक्त महेश चौथे यांनी कळविले आहे.

# ग्रामपंचायत पोटनिवडणूकांसाठी विशेष मनाई आदेश लागू

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त जागांच्या पोट निवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात येणारा प्रत्यक्ष निवडणुक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी मतदान व दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी मतमोजणी पक्रिया पार पडणार आहे. मतदान शांत, निर्भय व निःपक्षपाती वातावरणात पार पडावे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह-आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी नागरीक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार पिंपरी चिंचवड




पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ०३ ग्रामपंचायतीची निवडणुक होणार असून, त्यामध्ये १) दक्षिण चाकण पोलीस स्टेशन (बहुळ) २) दक्षिण महाळुंगे पोलीस स्टेशन (निघोजे) ३) शिरगाव पोलीस स्टेशन (गोडुंब्रे) या ग्रामपंचायतीचे हद्दीत दि.२८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०५.०० वा. पासुन खालील कृत्यास मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

१) मतदानादिवशी मतदान केंद्रात तसेच मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात मतदान केंद्र अध्यक्ष, निवडणुक कामकाज संदर्भाने नेमलेले शासकीय व्यक्ती, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी नेमलेले शासकीय व्यक्ती ज्यांना निवडणुक संदर्भाने संपर्क करणे आवश्यक आहे यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींना मोबाइल फोन, स्मार्ट फोन, वायरलेस किंवा संपर्क साधने वापरणेस सक्त मनाई आहे.

२) मतदान केंद्राचे २०० मीटर परिसरात तात्पुरते स्वरुपाचे पक्ष कार्यालय कोणत्याही धार्मिक, शैक्षणिक आस्थापनेत, रुग्णालयाजवळ किंवा अतिक्रमण करुन उभारणेस मनाई आहे.

३) सशस्त्र संरक्षण प्राप्त व्यक्तींना मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात सुरक्षा रक्षकासह प्रवेश करण्यास मनाई आहे. लोकप्रतिनीधीत्व अधिनियम, १९५१ कलम १३४ (ब) नुसार या कलमाव्दारे परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रामध्ये किंवा त्या परिसरात शस्त्र घेवुन जाण्यास किंवा शस्त्र दाखवण्यास प्रतिबंध आहे.

४) मतदान केंद्राचे २०० मीटर आतमध्ये इलेक्शन बुथ लावता येणार नाही. एका इमारतीत एकापेक्षा जास्त मतदान बुथ असतील तरी देखील त्या इमारतीसाठी एका उमेदवाराला एकापेक्षा जास्त बुथ लावता येणार नाही.

५) मतदान दिवशी मतदान केंद्राचे २०० मीटर क्षेत्रामध्ये प्रचार करणेस मनाई आहे.

६) मतदान केंद्राचे २०० मिटर त्रिज्येमध्ये खाजगी वाहन आणण्यास मनाई आहे.

७) लाउड स्पीकर, मेगाफोन, आरडाओरडा करणे, गोंधळ करणे, दुवर्तन करणे, अशा प्रकारास मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आहे.

८) ज्या मतदारसंघात मतदान होणार आहे तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते वा प्रचार कार्यकर्ते त्यांना त्या मतदारसंघात थांबणेस मनाई आहे.


९) राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने कोणतेही बल्कः मैसेज पाठविण्यास मनाई आहे.

१०) मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवणे, सार्वजनिक सभा, बैठता घेणे यास मनाई आहे.

११) मतदान दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे शस्त्र / हत्यारं बाळगणेस मनाई आहे.

सदर आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील निवडणुक प्रक्रीया (मतदान) राबविण्यात येणार असणारे संबंधित ग्रामपंचायत निवडणुक कार्यक्षेत्रात दि.२८ एप्रिल २०२६ रोजीचे सकाळी ०५.०० वा. ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहील.

## वाहन क्रमांक आरक्षणासाठी २८ एप्रिलपासून फेसलेस सेवा सुरू




**पुणे (दै. संध्या) :**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे नवीन वाहनांसाठी आकर्षक, पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्याची फेसलेस (ऑनलाईन) सेवा २८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजल्यापासून सुरू होणार आहे. ही सेवा पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात कार्यान्वित असून, कार्यालयामध्ये ऑफलाईन पद्धतीने शुल्क स्वीकारले जाणार नाही. नागरिकांनी ही सेवा घरबसल्या https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावरून वापर करता येईल. फेसलेस सेवा कार्यान्वित असून, अर्जदार आधार लिंक मोबाईल क्रमांकाद्वारे ओटीपी घेऊन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. नव्याने सुरू होणाऱ्या 'एमएच12झेडक्यु' मालिकेतील पसंतीचे नोंदणी क्रमांक अर्जदारांना आरक्षित करता येतील. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

## पिंपरी चिंचवड शहरातील स्वच्छता, अतिक्रमण व अनधिकृत नळ जोडण्यांवर महानगरपालिका कडक कारवाई करणार : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड शहरात स्वच्छता आणि शिस्त राखण्यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध आहे. नागरिकांनीही जबाबदारीने वागून नियमांचे पालन करावे आणि घर खरेदी करताना बांधकामास अधिकृत परवानगी असल्याची खात्री करावी. अनधिकृत जाहिराती, अतिक्रमणे, बेकायदेशीर नळ जोडण्या तसेच परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांवर अधिक तीव्र आणि कडक कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी प्रमुख अधिकारी व सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत अनधिकृत जाहिराती, अतिक्रमणे, बेकायदेशीर नळजोडण्या तसेच परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांसंबधी आढावा बैठक घेऊन त्यांनी प्रशासनाला ॲक्शन



मोडमध्ये काम करण्यास सांगितले. यावेळी ते बोलत होते. दृकश्राव्य माध्यमाद्वारे झालेल्या या बैठकीत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, किशोर ननवरे, परशुराम वाघमोडे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. शहरात स्वच्छता राखण्यासाठी विशेष भर देण्यात येणार असून, भिंती, दूरध्वनी खांब आणि एम एस ई डीसीएल डीपीवर लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर आणि जाहिरात फलक तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत तसेच, अशा फलकांवरील मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधून संबंधितांना नोटीस बजावण्याची कारवाईही करण्यात येणार आहे. अतिक्रमणमुक्त फुटपाथसाठी मोहीम तीव्र करावी पादचाऱ्यांना मोकळे आणि सुरक्षित मार्ग मिळावा यासाठी "अतिक्रमणमुक्त फुटपाथ" मोहिमेला गती देण्यात येत असून, विशेष पथके क्षेत्रीय स्तरावर कार्यरत राहणार आहेत. अनधिकृत नळ कनेक्शनवर थेट कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. शहरातील बेकायदेशीर नळजोडण्या शोधून त्यावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पाणी चोरी रोखण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. अनधिकृत बांधकामांवरही कठोर कारवाई करण्यात येईल त्यामध्ये परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांवर महापालिका कडक कारवाई करणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. अनधिकृत बांधकामे महापालिका निष्कासित करणार आहे.त्यामुळे नागरिकांनी बांधकाम परवानगी नसलेल्या ठिकाणची सदनिका खरेदी करू नये.खरेदी करीत असलेले घर किंवा सदनिकेला अधिकृत बांधकाम परवानगी असल्याची खात्री करावी असे आवाहन आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांनी केले आहे.

## 'एसीलोर स्टेलेस्ट' ही अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासन मान्यताप्राप्त एकमेव चष्मा लेन्स

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

एसीलोर लक्सोटिका गेल्या चार दशकांहून अधिक काळ या क्षेत्रातील संशोधनात अग्रभागी आहे, ज्याचा परिणाम म्हणून जगभरातील महत्त्वाच्या देशांमध्ये 'एसीलोर स्टेलेस्ट' लेन्स लाँच करण्यात आली आहे. आज जगभरातील लाखो मुले ही लेन्स वापरत आहेत. जगभरातील लोकांसाठी नाविन्यपूर्ण वैद्यकीय तंत्रज्ञान विकसित करण्याच्या आणि ते पोहोचवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, एसीलोर स्टेलेस्ट लेन्स नेत्रतज्ज्ञांना एक पुराव्यावर आधारित आणि विश्वासार्ह उपाय प्रदान करते. यामुळे पालकांना मायोपियाच्या आव्हानांचा सामना करण्यास मदत होते आणि मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्यात अल्पकालीन तसेच दीर्घकालीन सकारात्मक सुधारणा दिसून येतात.

गेल्या वर्षाच्या उत्तरार्धात, एसीलोर लक्सोटिकाने जाहीर केले की, अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने त्यांच्या 'एसीलोर स्टेलेस्ट' लेन्सला 'डी नोव्हो' मार्गाद्वारे बाजारपेठेत विक्रीसाठी अधिकृत मान्यता दिली आहे. यापूर्वी 2021 मध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने या उत्पादनाला 'ब्रेकथ्रू टेक्नॉलॉजी' (महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान) म्हणून दिलेल्या मान्यतेनंतरचा हा पुढचा टप्पा आहे. एसीलोर स्टेलेस्ट ही मुलांमधील मायोपियाचा वेग कमी करण्यासाठी अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाकडून बाजारपेठ मान्यता मिळालेली पहिली आणि एकमेव चष्मा लेन्स आहे. या लेन्सची परिणामकारकता क्लिनिकल डेटाद्वारे सिद्ध झाली असून, यामुळे दोन वर्षांच्या कालावधीत मुलांमधील मायोपिया वाढण्याचा वेग सरासरी 71% ने मंदावल्याचे दिसून आले आहे. भारतात मायोपियाच्या (नजीकचा दृष्टीदोष) प्रमाणात होणारी तीव्र वाढ ही एक वाढती चिंतेची बाब आहे. 2050 पर्यंत भारतातील शहरी भागातील जवळपास 50% मुले यामुळे बाधित होण्याची शक्यता आहे. आपल्या वैद्यकीय विश्वासार्हतेच्या वारशासह, एसीलोर लक्सोटिकाचे उद्दिष्ट 'नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स' आणि जागतिक मानकांनुसार, मायोपियाचा वेग कमी करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन मंजूर नवकल्पनांद्वारे भारतातील मायोपिया उपचारांमध्ये प्रगती करणे हे आहे. डॉक्टर, पालक आणि संस्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आणि पुराव्यांवर आधारित मायोपिया व्यवस्थापनासाठी सक्षम करून, 'एसीलोर स्टेलेस्ट' लेन्स भारतातील जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहोचवणे आणि उपचारांचा दर्जा उंचावणे, हे आमचे ध्येय आहे. भारतात डोळ्यांची तपासणी अनिवार्य नसल्यामुळे, अनेक मुलांमधील दृष्टीदोष न तपासलेले किंवा उपचार न केलेले राहतात. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या 'बॅक टू स्कूल' (शाळा सुरू होण्यापूर्वीच्या) नियमित तपासणीमध्ये डोळ्यांच्या चाचणीचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. मायोपिया हा केवळ डोळ्यांचा नंबर किंवा दोष नाही; तो एक आजार आहे जो काळानुसार वाढू शकतो – साध्या लेन्सेस केवळ मायोपिया सुधारू शकतात, पण तो वाढण्यापासून रोखू शकत नाहीत. म्हणूनच, मुलाला स्पष्ट दिसावे यासाठी पालकांनी दरवर्षी डोळ्यांची तपासणी करून घेणे गरजेचे आहे. एसीलोर लक्सोटिका अशा क्षेत्रांना प्राधान्य देत आहे जिथे मायोपियाबद्दल अधिक जागरूकता आहे आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची क्षमता जास्त आहे; यामध्ये मेट्रो शहरे आणि पुणे, कोयंबतूर, अहमदाबाद, कोची व चंदीगड सारख्या उदयोन्मुख केंद्रांचा समावेश आहे. ही व्याप्ती हळूहळू टियर-2 आणि टियर-3 शहरांमध्ये नेत्ररोगतज्ज्ञ, ऑप्टोमेट्रिस्ट, ऑप्टिकल नेटवर्क्स आणि व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून वाढवली जाईल. या मान्यतेबद्दल माहिती देताना, एसीलोर लक्सोटिका इंडियाचे मेडिकल अँड प्रोफेशनल अफेअर्स संचालक, डॉ. कुणाल श्रीवास्तव म्हणाले: "गेल्या अनेक दशकांपासून, भारतीय वैद्यकीय क्षेत्रात अन्न आणि औषध प्रशासन मान्यता ही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उपचारांची ओळख बनली आहे. डॉक्टर, रुग्णालये आणि रुग्ण अनेकदा अन्न आणि औषध प्रशासन मान्यतेकडे वैद्यकीय विश्वासार्हतेचा सर्वोच्च निकष म्हणून पाहतात. हे लेन्स तंत्रज्ञान पारंपारिक नंबरच्या चष्म्याचे रूपांतर एका खऱ्या वैद्यकीय उपचारामध्ये करते. नेत्रसेवा तज्ज्ञांसाठी मायोपियाच्या समस्येवर मात करण्याच्या दृष्टीने ही एका नवीन युगाची सुरुवात आहे." एसीलोर लक्सोटिका इंडियाचे अध्यक्ष वेणू अंबाती यांनी भाष्य केले की: "भारतातील 'एसीलोर स्टेलेस्ट' साठी हा अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा आहे. यामुळे मायोपिया व्यवस्थापनात 'एसीलोर स्टेलेस्ट' हे 'गोल्ड स्टँडर्ड' (सुवर्ण मानक) म्हणून सिद्ध झाले असून डॉक्टर, पालक आणि संस्थांमधील विश्वास अधिक दृढ झाला आहे. मुलांमधील मायोपियाची वाढ रोखण्यासाठी वेळेवर आणि माहितीपूर्ण निर्णय घेणे आवश्यक असते; यामध्ये उशीर केल्यास डोळ्यांच्या आरोग्यावर आयुष्यभर परिणाम होऊ शकतात. जेव्हा पहिल्यांदा मायोपिया वाढत असल्याचे आढळते, तेव्हाच त्याला नियंत्रित करण्याची पालकांची ही महत्त्वाची गरज 'एसीलोर स्टेलेस्ट' पूर्ण करते.

भक्कम क्लिनिकल पुरावे आणि अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाची मान्यता असलेली ही केवळ लेन्स नसून, मुलांच्या भविष्यातील डोळ्यांच्या आरोग्यासाठी केलेली एक गुंतवणूक आहे. ज्या काळात मायोपिया ही एक जागतिक महामारी म्हणून समोर येत आहे, त्या काळात पालकांना त्यांच्या मुलांच्या दृष्टीच्या आरोग्याबाबत जागरूक आणि सक्रिय करण्यासाठी आमचा हा उपक्रम मैलाचा दगड ठरेल."

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे पाडळी, ता. जुन्नर व परिसरातील लोकांस आमचे अशिल रोहीदास लक्ष्मण कबाडी व इतर तर्फे या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथिल शेतमिळकती गट नं. १८५,१८६ व १८७ या मिळकतींचा जुना सर्व्हे नं. ४९/१अ ४९/१ब व ४९/१क असा असून सदर मिळकतीसंबंधाने गटवारी पुर्वी दिनांक ०५/१२/१९६७ रोजी तबा, रामा व लक्ष्मण बाळाजी कबाडी या भावांमध्ये समसमान म्हणजेच प्रत्येकी पोटखराब्यासह ०हे. ५१आर इतक्या क्षेत्राचे वाटप करण्यात आलेले असून सदर वाटपाप्रमाणे पश्चिमेचे क्षेत्र तबा, उत्तरेकडील क्षेत्र रामभाऊ व दक्षिणेकडील क्षेत्र लक्ष्मण यांचे वाटपात देण्यात आलेले असून त्याप्रमाणे फाळणीबारा व नकाशे तयार करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतींमध्ये ज्याचेत्याचे ताबे होते व आहे.

असे असतांना गावी गटवारी होतांना सदर मिळकतींबाबत चुकीचे क्षेत्र नमुद करण्यात आलेने त्याबाबत आमचे अशिल यांनी भुमि अभिलेख कार्यालयात तक्रारी केलेल्या असून सदर तक्रारींच्या अनुशंगाने सदर मिळकतींच्या क्षेत्राबाबत आमचे अशिल व गट नं. १८५ चे मालक यांचेत वाद सुरू आहे.

वास्तविक सदरकामी जुना स. नं. ४९/१अ त्यांचा नविन गट नं. १८५ चे कै. तबा बाळाजी कबाडी यांना वाटपात पोटखराब्यासह ०हे. ५१आर इतकेच क्षेत्र कौटुंबिक वाटपात देण्यात आलेले असून गटवारीत त्यांचे नावे बेकायदेशीरपणे पोटखराब्यासह १हे.०५आर क्षेत्र दाखल करण्यात येवून गट नं. १८६ व गट नं. १८७ वर पोटखराब्यासह ०हे.२४आर क्षेत्र दाखल करण्यात आलेले आहे. परंतु गटवारी प्रमाणे कोणतेही क्षेत्र त्यांचे ताब्यात नसुन तबा, रामा व लक्ष्मण बाळाजी कबाडी यांचे वारसांचे ताब्यात प्रत्येकी पोटखराब्यासह ०हे. ५१आर क्षेत्र कौटुंबिक वाटपाप्रमाणे ताब्यात होते व आहे.

असे असतांना आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे गटवारीतील क्षेत्राबाबत सक्षम अधिकारी यांचे कोर्टात वाद उपस्थित केल्याने गट नं. १८५ चे विदयमान मालक माणीकबाई राजाराम कबाडी, नितीन राजाराम कबाडी, निलेश राजाराम कबाडी, साधना अंकुश कबाडी, व निलम जालिंदर लांडे हे गटवारी समयी बेकायदेशीरपणे ७/१२ सदरी दाखल असलेल्या चुकीच्या क्षेत्राचे आधारे सदर अधिकच्या क्षेत्रासह मिळकतीचे इतर त्रयस्थ व्यक्तिस हस्तांतरण करण्याचे प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायक रित्या समजल्याने आमचे अशिलांना सदरची जाहिर नोटीस इतर कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून देणे भाग झाले आहे.

सबब सदर नोटीसीने कळवितो की, मौजे पाडळी, ता. जुन्नर येथिल गट नं. १८५ या मिळकतींच्या गटवारीत दाखल चुकीच्या क्षेत्राबाबतची आमचे अशिलांचा वाद प्रलंबित असून सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी दाखल जादा क्षेत्राचे खरेदीखत करून देण्याचा विदयमान मालक यांना कोणताही हक्क व अधिकार नसून सदर मिळकतीचे खरेदीखत अस्तित्वात आणल्यास सदर मिळकतीबाबत दिनांक ०५/१२/१९६७ रोजी अस्तित्वात आणलेल्या वाटपाचे क्षेत्राव्यतिरीक्त जादा क्षेत्राचा कोणताही ताबा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

जुन्नर.
दि. १७/०४/२०२६.
ॲड. वैभव ई. परदेशी,
२१२, राहिल कॉम्प्लेक्स, नेहरूबाजार, जुन्नर,
ता. जुन्नर, जि. पुणे.४१०५०२.
मो. ९६२३५७३८३२, ७७२३९१९९९९.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
नोटीस देणार
रोहीदास लक्ष्मण कबाडी व इतर

# सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

## नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विकास कामांचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडून सविस्तर आढावा

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड शहराच्या विकासकामांमध्ये गुणवत्ता आणि पारदर्शकता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून द्याव्यात तसेच महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून शहरातील विकास कामांचा वेग वाढविण्याचे आणि प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शहरातील विविध महत्त्वाच्या विकासकामांची आढावा बैठक घेतली. यावेळी राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या. बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे स्वागत केले, यावेळी विधान परिषद सदस्य उमा खापरे,अमित गोरखे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शहर सुधार समितीचे सभापती संजय काटे, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, धर्मराज तंतरपाळे आदी उपस्थित होते.

तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपसंचालक नगररचना किशोर गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, स्मार्ट सिटीचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सह शहर अभियंता बापू गायकवाड, सुनिल भगवानी, प्रेरणा सिनकर, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीच्या सुरुवातीस आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरणातून शहरात सुरु असलेले पाणी पुरवठा प्रकल्प, अमृत योजना २. ०, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, रस्ते विकास प्रकल्प, शहरातील ड्रेनेज व पायाभूत सुविधा सुधार प्रकल्प, मेट्रो वाहतूक प्रकल्प, रस्ते विकास प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना, हुतात्मा क्रांतिवीर चापेकर वाडा, अग्निशमन केंद्र, नोकरदार महिला वसतिगृह, संतपीठ प्रकल्प, मनोरंजन प्रकल्प, नदी सुधार प्रकल्प, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता तसेच विविध नागरी प्रकल्पाची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना दिली.

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे निरगुडे, ता. जुन्नर व परिसरातील लोकांस आमचे अशिलांतर्फे या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशीष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत लिहून देणार श्री. विनय अनंत वाबळे व श्री. संतोष सिताराम तांबोळी यांचे मालकीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिल श्री. सुदिन सुभाषचंद्र मेहता रा. गुलटेकडी, पुणे यांना विकण्याचे निश्चीत केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचा तसेच सदरची मिळकत विकण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकाला असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल सदर मिळकतीचे मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत. सबब सदर जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील परिशीष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचा खरेदी, विक्री, तारण, गहाण, लीज, लीन, दान, वारसहक्क, अग्रहक्क, पोटगी, भाडेपट्टा, कोर्ट जप्ती, बक्षीस, वहीवाट, कोणत्याही न्यायीक/ अर्ध न्यायीक न्यायालयाचे आदेश, हुकूम अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आवश्यक त्या कागदपत्रांसह आमचेशी खालील नमुद पत्यावर संपर्क साधून त्याबाबत खात्री पटवून द्यावी. (परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात दिलेली हरकत ग्राहय धरली जाणार नाही.) अन्यथा सदरील मिळकतीवर वर नमूद मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही, असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार याबाबत चालणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**परिशीष्ट**

मिळकतींचे वर्णनः- तु. व जि.प.पुणे, पोट तुकडी तालुका जुन्नर, पं.स. जुन्नर व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर तसेच ग्राम पंचायत निरगुडे यांचे हद्दीतील गांव मौजे निरगुडे येथिल शेतमिळकत गट नं. ६७८ क्षेत्र १ हे. ४२आर. पोटखराब क्षेत्र ० हे. ०३ आर एकुण क्षेत्र १ हे. ४५ आर. आकार २ रू.९१ पैसे. यापैकी श्री. विनय अनंत वाबळे यांचे नावे नमुद खाते क. १२९८ वरील क्षेत्र ० हे. १६आर. आकार ० रू. ३३ पैसे. व श्री. संतोष सिताराम तांबोळी यांचे नावे नमुद खाते क. १३०१ वरील क्षेत्र ० हे. १८आर. आकार ० रू.३७ पैसे. असे एकुण क्षेत्र ०हे.३४ आर. आकार ०रू. ७० पैसे. येणेप्रमाणे वर्णनाची शेतमिळकत.

जुन्नर.
दि. १७/०४/२०२६.
ॲड. वैभव ईश्वरसिंह परदेशी, नोटरी (भारत सरकार)
नेहरूबाजार, जुन्नर, जि. पुणे.४१०५०२.
मो. ९६२३५७३८३२, ७७२३९१९९९९

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
नोटीस देणार
श्री. सुदिन सुभाषचंद्र मेहता.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मौजमजेसाठी दुचाकी चोरणारे सराईत जेरबंद; हिंजवडी पोलिसांची कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : चैनीसाठी आणि मौजमजेसाठी दुचाकी चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना हिंजवडी पोलिसांनी अटक करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे हिंजवडी, वाकड आणि चिंचवड परिसरातील तब्बल १० वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून एकूण ९ दुचाकी, एक लॅपटॉप आणि मोबाईल फोन असा सुमारे ४ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आदित्य संतोषकुमार पटेल आणि ओम किशोर चिस्तळकर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. वाहन चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर हिंजवडी पोलिसांकडून विशेष गस्त घालण्यात येत होती. त्यावेळी बोडकेवाडी फाट्याजवळ एक तरुण विनानंबर प्लेटच्या दुचाकीसह संशयास्पद स्थितीत आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा झाला. तपासादरम्यान आरोपींनी केवळ मौजमजेसाठी दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. पोलिस तपासात उघड झाले की, आरोपींवर हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८ गुन्हे, वाकडमध्ये १ आणि चिंचवडमध्ये १ असे एकूण १० गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, ऋषिकेश घाडगे आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



### दापोडी-फुगेवाडीत जीर्ण विद्युत यंत्रणा धोकादायक; बदलाची मागणी

दापोडी (दैनिक संध्या) : उद्योगनगरीचा स्मार्ट सिटीमुळे चेहरामोहरा बदल असतानाच दापोडी आणि फुगेवाडी परिसरात मात्र 20 वर्षांहून अधिक काळ जुनी झालेली विद्युत यंत्रणा अपघाताला निमंत्रण देत आहे. येथील रोहित्राचे खांब, विद्युत वाहिनी, डीपी बॉक्स जीर्ण झाल्याने पावसाळ्यात नागरिकांना अपघाताचा धोका होऊ शकतो. यामुळे येथील विद्युत यंत्रेणेत बदल करणे काळाची गरज आहे. दापोडी येथील डीपी बॉक्स, रोहित्र आणि विजेच्या केबल्सची दुरवस्था झाली आहे. विशेषतः दापोडीतील मुंबई कॉलनी आणि पवना घाट हा परिसर दाट लोकवस्तीचा आणि वर्दळीचा असून, येथील उघड्यावर डीपी बॉक्स, रोहित्रावर झाडांच्या फांद्या अडकलेल्या आहेत. यामुळे पावसाळ्यात शॉर्ट सर्किट होऊन मोठी आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. घरगुती कनेक्शनसाठी वापरले जाणारे डीपी बॉक्स खालच्या बाजूने पूर्णपणे गंजले असून, पावसाचे पाणी शिरल्याने वारंवार तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता आहे. प्रशासनाला जाग येण्यासाठी एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहिली जात आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. फुगेवाडी परिसरातील स्थितीही सारखीच असून, जुन्या झालेल्या डीपी बॉक्समुळे वीजपुरवठा अनेकदा खंडित होतो. एकीकडे महावितरण स्मार्ट मीटरच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाची सक्ती नागरिकांना करत आहे. दुसरीकडे मात्र जुनाट यंत्रणा सुधारण्याकडे दुर्लक्ष करत आहे. या असुरक्षित यंत्रणेमुळे वीजचोरीचे प्रमाणही वाढले आहे.



### पिंपरी मंडईत भाजीपाल्याचे दर स्थिर; पालेभाज्यांचे दर वाढले

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री मंडईत रविवारी (दि. 26) गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर होते; मात्र पालेभाज्यांचे दर वाढले आहेत. बाजारात वाघाट्या भाजीची आवक सुरू झाली आहे. सध्या त्याचा दर 160 रुपये किलो आहे. तसेच, उन्हामुळे आवळ्यांना मागणी वाढली आहे. कोथिंबीर व मेथीची जुडी 30 रुपये दराने विक्री केली जात आहे. गवार आणि शेवगा आता 50-60 रुपये किलो दराने उपलब्ध आहे. वांगी, फ्लॉवरचा दर 40-50 रुपये किलो असा आहे. मिरची 60 रुपये, कर्नाटक कैरी 50 - 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. कांदे 100 रुपयांना पाच किलो प्रमाणे विक्री केली जात आहे, तर लसूण 100 - 150 रुपये, आले 60 - 80 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. फळभाज्यांचे दर : रविवारी बाजारात गवार 70 रुपये किलो, शेवगा 40, टोमॅटो 25, भेंडी 50, फ्लॉवर 40, कोबी 30, मिरची 50, गाजर 25, शिमला 60, लसूण 100 - 120, आले 60, वांगी 30, काकडी 30, कारले 70, कांदे 20 - 25 किलो, बटाटा 25- 30 रुपये किलो, बिन्स 60 रुपये किलो, पावटा 70, लाल भोपळा 30, घोसाळी 60, दोडका 70, तोंडली 70 रुपये, बीट 50, दुधी 40, घेवडा 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये तापमान 41 अंशांवर; उष्णतेने नागरिक हैराण

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात सलग दुसऱ्या दिवशी पारा उसळलेलाच होता. शहराचे तापमान रविवार (दि. 26) 41 अंश इतके नोंदविले गेले. रविवार सुट्टीचा दिवस असूनही तापमानाच्या चढत्या पाऱ्यामुळे रस्त्यावरील वर्दळ कमी होती. एकंदर वाढत्या तापमानाने शहरवासीयांना घाम फुटत आहे. उन्हामुळे त्वचेची व डोळ्यांची जळजळ, डोकेदुखी, चक्कर येण्याचे प्रमाण वाढले आहे. थोडावेळ उन्हात थांबले तरी घामाच्या धारा लागत आहेत. यामुळे थंड पेय पिण्याचे प्रमाण वाढल्याने सर्दी, खोकला, तापाच्या रूग्णांची संख्या वाढली आहे. उन्हापासून संरक्षणासाठी गॉगल, टोपी, स्कार्फ, पांढरे कपडे यांचा वापर केला जात आहे. शहरातील बंधाऱ्यांवर देखील पोहणाऱ्यांची गर्दी पहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाचा प्राण्यांवर देखील परिणाम होताना दिसत आहे. प्राणी घराच्या, इमारतीच्या, झाडांच्या सावलीचा आधार घेताना दिसत आहे. ओलसर जागेत बसून शरीराला गारवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. कामानिमित्त घराबाहेर पडताना शक्यतो अंगभर कपडे घालावेत, जेणेकरून उन्हापासून शरीराचे संरक्षण होऊ शकेल.

# पवना धरणातून गाळ काढण्यास प्रारंभ

## खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार : सलग दहाव्यावर्षी काढला जातोय गाळ

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याच्या उद्देशाने धरणातून गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सलग दहाव्या वर्षी धरणातून गाळ काढण्यात येत असून, त्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढाकार घेतला आहे. शासनाचा कोणताही निधी न घेता लोकसहभागातून गाळ काढला जात आहे. गाळ काढल्याने धरणातील साठवण क्षमतेत वाढ झाली असून उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत नाही. पवना धरणातून गाळ काढण्याच्या कामाला रविवारपासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी विधिवत पूजन करून मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात झाली. खासदार बारणे यांनी



गेल्या १० वर्षांपासून शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता लोकसहभागातून हे गाळ काढण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले आहे. यामुळे धरणातील पाणीसाठा वाढण्यास मदत होत असून, परिसरातील जलसंधारणाला बळ मिळत आहे. यंदाही पवना धरणातील जास्तीत जास्त गाळ काढून पाणीसाठ्यात वाढ करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, मावळ तालुका प्रमुख राम सावंत, उपतालुका प्रमुख अमित कुंभार, सोमनाथ कोंडे, मदनभाऊ शेडगे, युवासेना जिल्हा प्रमुख सागर पाचरणे, उपजिल्हा प्रमुख दत्ताभाऊ केदारी, कामशेत शहर प्रमुख सतीश इंगवले, भगवान भिकोले, माजी सरपंच लाला गोंते, माजी उपसरपंच काळूभाऊ उंबरकर, अक्षय उंबरकर, भगवान दरेकर, बाळासाहेब दरेकर, एकनाथ दरेकर, अमित मोरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या ५० वर्षांपासून पवना धरणातील गाळ काढला जात नव्हता. त्यामुळे पाणी साठण्यास अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे गेल्या नऊ वर्षांपासून धरणातील गाळ काढण्यास सुरुवात केली. परिणामी, धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जाऊ लागले नाही. उन्हाळ्यात देखील पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. पावसाळा सुरू होईपर्यंत गाळ काढण्याचे काम चालू राहणार आहे. खासदार बारणे म्हणाले, पवना धरणातून पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा होतो. या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साठला जातो. त्यामुळे पाणीसाठ्यात अडथळा निर्माण होतो. परिणामी पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जाण्याची वेळ येते. धरणातून गाळ काढण्याला सुरुवात करण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड शहराला दोन दिवसाआड पाणी मिळत होते. पाण्याची मोठी टंचाई जाणवत होती. त्यामुळे मागील नऊ वर्षांपासून दरवर्षी उन्हाळ्यात धरणातील गाळ काढण्यात येत आहे. आत्तापर्यंत ८५ हजार क्युबिक मीटर गाळ धरणातून काढला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे उन्हाळ्यातही तीव्र पाणीटंचाई जाणवत नाही.

### गाळातून गुलाब शेतीही फुलली

पवना धरणातील काढलेला गाळ मावळातील शेतकऱ्यांना निशुल्क दिला जातो. मावळ तालुक्यातून मोठ्या प्रमाणात गुलाबाची जगात निर्यात केली जाते. गुलाब शेतकऱ्यांना पोयटा मातीचा फायदा होता. त्यामुळे गुलाबाच्या उत्पन्नात भर पडते. गुलाबाच्या शेतीतही वाढ झाली. पाणीसाठवण क्षमताही वाढली आणि गुलाबाची शेतीही फुलल्याने नागरिकांना दुहेरी फायदा होत आहे. त्यामुळे स्थानिकांनी खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले आहेत.

## आज शहरातील सायंकाळचा पाणीपुरवठा राहणार बंद

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी: पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवार, दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या



पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से. क्र. २३ येथील तसेच क्षेत्रीय स्तरावरील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

या कामांसाठी २८ एप्रिल २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे २८ एप्रिलला पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार असून २९ एप्रिलला सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.

> निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरील देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी २८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरेसा साठा करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करून सहकार्य करावे. देखभाल-दुरुस्तीची सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील राहील.
> **– प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## भामा-आसखेड जलप्रकल्पात विलंब; ठेकेदार बडतर्फ, ८४ कोटींची नवी निविदा

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने भामा-आसखेड धरणातून 167 पाणी आणण्यासाठी भूमिगत जलवाहिनीसह इतर कामे करण्यात येत आहेत. वारंवार मुदतवाढ देऊनही जलवाहिनीच्या कामास विलंब केल्याने संबंधित ठेकेदार बडतर्फ केला असून, उर्वरित 30 टक्के कामासाठी निविदा काढण्यात आली आहे. त्या कामाची मुदत 9 महिने असून, त्यासाठी दोन वेगवेगळे ठेकेदार नेमले जाणार आहेत. त्या कामासाठी बडतर्फ ठेकेदाराला संधी देण्यात येणार नाही, असे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून शहरासाठी 167 एमएलडी पाणी भूमिगत जलवाहिनीद्वारे

**उर्वरित 30% कामासाठी दोन ठेकेदार**

चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणण्यात येणार आहे. वारंवार मुदतवाढ आणि सक्त सूचना देऊनही मुंबई येथील ऑफशेर इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेड या ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही. अद्याप 30 टक्के काम शिल्लक आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने संबंधित ठेकेदाराला बडतर्फ करून नव्याने अल्प मुदतीची निविदा काढण्यात आली आहे. निविदा 10 एप्रिलला प्रसिद्ध करण्यात आली आहे. भामा आसखेड धरणापासून नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर ट्रॅकपर्यंत 1700 मिलीमीटर व्यासाची भूमिगत जलवाहिनी टाकण्याचे उर्वरित काम करण्यासाठी 33 कोटी 35 लाख रुपये खर्चाची निविदा आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अँटी ड्रग मोहीम कडक

पिंपरी (दै. संध्या)

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या प्रादुर्भावावर आळा घालण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने सर्वसमावेशक आणि कडक 'स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर' (SOP) लागू केली आहे. अमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनांनुसार प्रत्येक शाळा, महाविद्यालय आणि वसतिगृह स्तरावर अँटी ड्रग कमिटी स्थापन करण्याबरोबरच सरप्राईज चेकिंग स्क्वॉड कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि भविष्य अबाधित ठेवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनतेचा वाढता धोका लक्षात घेऊन पोलिस ठाणे स्तरावर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. पथनाट्य, व्याख्याने, चर्चा सत्रे, निबंध, वक्तृत्व, पोस्टर व चित्रकला स्पर्धांच्या माध्यमातून अंमली पदार्थांचे दुष्परिणाम प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जाणार आहेत. यासाठी अंमली पदार्थ टास्क फोर्सने तयार केलेली मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पीपीटी सादरीकरण वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाचे छायाचित्र, व्हिडिओ संकलन करून सविस्तर अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## पावसाळ्यापूर्वी हिंजवडीतील नालेसफाई, रस्ते दुरुस्तीला गती द्या!

हिंजवडी (दै. संध्या)

**महानगर आयुक्तांचे प्रशासनाला आदेश; आमदार शंकर मांडेकरांसह 'आयटी' परिसराची पाहणी**

माहिती तंत्रज्ञान नगरी (आयटी हब) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी आणि लगतच्या गावांमध्ये पावसाळ्यात उद्भवणारी वाहतूक कोंडी व पाणी साचण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरात पावसाळ्यापूर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी



केल्या. स्थानिक आमदार शंकर मांडेकर आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह महानगर आयुक्तांनी शनिवारी (२५ एप्रिल) या भागाचा सविस्तर पाहणी दौरा केला. मुळशी तालुक्यातील हिंजवडी, माण, मारुंजी, भूगाव आणि पिरंगुट या पट्ट्यात पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था आणि अपूर्ण नालेसफाईमुळे नागरिकांना दरवर्षी मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर परिसरातील सर्व नैसर्गिक ओढे व नाले अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या सफाईची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश महानगर आयुक्तांनी दिले. विशेषतः 'नांदे चौक' येथील पावसाळी जलवाहिन्यांचे (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) काम प्राधान्याने मार्गी लावण्यास त्यांनी सांगितले.

हिंजवडी आयटी पार्क आणि औद्योगिक वसाहतींमधील वाहनांची मोठी वर्दळ लक्षात घेता, मर्सिडीज शोरूम (राष्ट्रीय महामार्ग ४८) ते हिंजवडी फेज-१ या जोडरस्त्याचा विकास वेगाने करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच लक्ष्मी चौक, कोलते-पाटील रस्ता आणि नेरे-दत्तवाडी-जांबे येथील रस्त्यांचे रुंदीकरण व विकासाचा आढावा घेण्यात आला. 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून सुरू असलेल्या 'प्राईड रोड'च्या कामाची महानगर आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा दर्जा आणि गतीबाबत समाधान व्यक्त केले.

# सोसायटीधारकांच्या हक्कांच्या लढ्यासाठी फेडरेशन 'कटिबद्ध'

**पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाची निवडणूक शांततेत; बिनविरोध निवडणूक करण्यासाठी दत्तात्रय देशमुख यांच्या मनाचा मोठेपणा**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक शांततेत व उत्साहात पार पडली. या निवडणुकीचा अधिकृत निकाल प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी जाहीर केला. विशेष म्हणजे, महासंघाचे मावळते अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी निवडणूक बिनविरोध करावी, असा संदेश अर्ज माघारी घेतला. मात्र, ११ जागासांठी १४ अर्ज असल्यामुळे मतदान घ्यावे लागले.

सोसायटी फेडरेशनच्या कमिटीसाठी निवडणूक सन 2026 ते 2031 या कालावधीसाठी घेण्यात आली. एकूण ११ सदस्यांची ही निवडणूक सर्वसाधारण मतदार



संघातून घेण्यात आली असून, एकूण अधिकृत 27 मते पडली. यापैकी सर्व 27 मते वैध ठरली असून, एकही मत अवैध झाले नाही. रविवार, दि.26 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 वाजता विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच मतदान प्रक्रिया पूर्ण करून निकाल जाहीर करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

या निवडणुकीत विविध सोसायटींच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी निवडणुकीचा सविस्तर अहवाल व बैठकीचे इतिवृत्त संबंधित प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (3) यांच्याकडे सादर केले आहे. या निवडणुकीमुळे संस्थेच्या पुढील पाच वर्षांच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळणार असून, सदस्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

नवीन कार्यकारिणीमध्ये पदवाटप दोन-तीन दिवसांत करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन कटिबद्ध राहील, असा संकल्प नवनिर्वाचित सदस्यांनी केला आहे.

विजयी उमेदवारांची नावे : सचिन लोंढे, अरुण देशमुख, सचिन गुणाले, अधिकराव दिवे- पाटील, विकास बाबर, प्रदीप घोरपडे, सचिन सिंध्ये, अजय तोडकर, रोहित सावंत, वैभव चौधरी, रोहित पाठक.

सोसायटी फेडरेशनची निवडणूक बिनविरोध व्हावी. या करिता सर्व सदस्यांनी प्रयत्न केला. मात्र, ११ जागांसाठी १६ उमेदवारी अर्ज दाखल झाले. ज्येष्ठ सदस्यांनी सर्वांना सहमतीने निवडणूक करा आणि बिनविरोध करण्याबाबत संवाद केला. त्यानंतर माजी अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी पुढाकार घेतला आणि स्वत:चा अर्ज माघारी घेतला. तसेच, "आपण निवडणूक बिनविरोध करु आणि सकारात्मक संदेश देवू.." अशी भूमिका मांडली. १६ पैकी दोन अर्ज माघारी झाले. पण, ३ अर्ज जास्तीचे असल्यामुळे निवडणूक घेणे अपरिहार्य ठरले. अखेर निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदान घेण्याचा निर्णय घेतला. मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि सर्वाधिक मते मिळवलेल्या ११ विजयी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित सदस्यांमध्ये ज्या सहकाऱ्यांना संधी मिळाली नाही. त्यांना फेडरेशनवर तज्ञ- सल्लागार सदस्यपदी नियुक्ती करण्याचे विचाराधीन आहे. फेडरेशन आणि सोसायटीधारकांचे कार्य एकजुटीने आणि सक्षमपणे करण्यात येईल. यावर उपस्थित सर्व सदस्यांचे एकमत झाले आहे.



# वाहतूक कोंडीमुळे नागरिक सोसताहेत मरणयातना

चाकण (दै. संध्या)

कांदा बटाट्याचे प्रसिद्ध मार्केट असलेल्या चाकण मधील परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत चालली असून, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरशः मरणयातना सहन करत आहेत. चाकण हे आता शहर राहिले नसून एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक केंद्र झाले आहे. त्या मानाने चाकण परिसरातील पायाभूत सुविधा आणि वाहतूक नियोजन अत्यंत तोकडे पडत आहे. चाकण मधील वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोय नसून ती आता नरकयातना झाली आहे. चाकण मध्ये रस्त्याच्या दुतर्फा असलेली अनधिकृत दुकाने आणि टपऱ्यांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. नियोजनशून्य पार्किंग बनले आहे. अवजड वाहने, ट्रक, कंटेनर रस्त्याच्या कडेलाच उभी केली जात आहेत. यामुळे खऱ्या अर्थाने शहरात वाहतुकीला अडथळा होतो. अरुंद रस्ते आणि उड्डाणपुल असून नसल्यासारखे आहेत. वाढत्या वाहनांच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरणही रखडलेले आहे. विरुद्ध दिशेने येणारी वाहने आणि सिग्नल यंत्रणेचा अभाव आहे.

प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. चाकण नगरपरिषदेने पोलिसांच्या मदतीने जुन्या पुणे नाशिक रस्त्यावरील चाकण हद्दीतील अतिक्रमणे कायमस्वरूपी हटविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. नो पार्किंग झोनची कडक अंमलबजावणी करून चाकण मधील मुख्य चौकात आणि रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या जड वाहनांवर जप्तीची कारवाई होणे अपेक्षित आहे. नगरपरिषदेने स्वतःचे ट्रॅफिक वॉर्डन्स नेमून पोलिसांना मदत करणे आवश्यक आहे. औद्योगिक वसाहतीत ट्रकसाठी शहराबाहेर हक्काच्या पार्किंगची सोय करण्याची गरज आहे.

**■ ठोस उपाययोजना करा**

"प्रशासकीय यंत्रणा ढिम्म झाल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याने चाकण मधील वाहतूक कोंडीचा विषय संपूर्ण राज्यात चर्चिला जात आहे. प्रशासनाने तातडीने यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी वरिष्ठांकडे पाठपुरावा केला पाहिजे."

**- मंगेशभाऊ कांडगे, नगरसेवक, चाकण.**

# बांधकाम साईटवरून अ‍ॅल्युमिनियम प्लेटा चोरणारी टोळी जेरबंद

## ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त, चाकण येथील प्रकार

चाकण (दै. संध्या)

चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजनेच्या बांधकाम साईटवरून २८० स्क्वेअर मीटर अ‍ॅल्युमिनियम शटरिंग प्लेट्स चोरणाऱ्या टोळीचा चाकण उत्तर पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार मुख्य चोरट्यांसह चोरीचा माल विकत घेणाऱ्या एका व्यावसायिकाला रविवारी (दि.२६) रात्री उशिरा अटक केली. रामरक्षा ऊर्फ राजू धर्मराज पासवान (वय ४०, रा. सुसगाव), स्वराज शांताराम कालापाड (२३), स्वप्नील शांताराम कालापाड (२५) आणि अक्रम रफिकउल्ला खान (२८, सर्व रा. येलवाडी, ता. खेड) तर चोरीचा माल विकत घेतल्याप्रकरणी अतुल संभाजी सोनवणे (वय ३३, रा. लोणीकंद) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच, या गुन्ह्यात सामील असलेले भंगार व्यावसायिक राजकुमार यादव आणि धनराज आकोडीया (दोघे रा. पुणे) हे फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चाकणमधील राक्षेवाडी (दि.१८ एप्रिल २०२६) येथील बांधकाम साईटवरून




२० लाख रुपये किमतीच्या अ‍ॅल्युमिनियम प्लेट्स चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती. चाकण उत्तर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली होती.

तपासादरम्यान पोलिसांना घटनास्थळ परिसरात एक बेवारस मोटारसायकल मिळून आली. त्या गाडीचा तांत्रिक तपास आणि परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे बारकाईने फुटेज तपासल्यानंतर पोलिसांना मुख्य आरोपींचा सुगावा लागला. आरोपींनी प्लेट्स चोरल्यानंतर त्या कात्रज येथील एका विक्रेत्याला विकल्या होत्या. तिथून या प्लेट्स चाकणमधील एका व्यावसायिकाकडे आणि नंतर पुन्हा शिक्रापूर येथे विकल्या गेल्या. चोरीचा माल असल्याचे माहित असूनही खरेदी - विक्री केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

ही कारवाई पोलीस उप - आयुक्त मारुती जगताप, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, भैरोबा यादव करत आहेत.

# मीना नदीचे पात्र कोरडे, विहिरी तळाला

नारायणगाव (दै. संध्या)

मीना नदीवरील पिंपळगाव येथील सतीकोन कोल्हापूर बंधारा मागील पंधरा दिवसापासून कोरडा पडल्यामुळे या भागात पाणीटंचाईची तीव्र समस्या निर्माण झाली आहे. गुंजाळवाडी, वडगाव परिसरातील विंधन विहिरी व विहिरीची पाणी पातळी घटल्याने शेतातील उभी पिके, जनावरांचा चारा सुकला आहे. पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे.शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी वडज धरणामधून पिंपळगाव येथील बंधाऱ्यात तातडीने पाणी सोडावे. अशी मागणी शेतकऱ्यांनी कुकडी पाटबंधारे विभागाकडे केली आहे. याबाबत शेतकरी संपत वाणी, दत्तात्रय वाणी, सोपान खांडगे, कुंडलिक वाणी म्हणाले मीना नदीवर पिंपळगाव येथे बंधारा बांधण्यात आला आहे. या बंधाऱ्याच्या पश्चिम बाजूकडील सावरगाव व वडगाव सहानी येथील बंधाऱ्यात वडज धरणातून पाणी सोडण्यात आले होते. यामुळे त्या बंधाऱ्यात पाणी आहे. मात्र पिंपळगाव येथील सतीकोन बंधाऱ्यात पाणी न सोडल्याने हा बंधारा मागील पंधरा दिवसापासून कोरडा आहे.या मुळे या भागातील शेतकरी व नागरिकांना एप्रिल महिन्यात पाणीटंचाईच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. मीना नदीचे पात्र कोरडे पडल्यामुळे परिसरातील विहिरी, विंधन विहीर यांनी तळ गाठला आहे. या भागात गोपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. तापमानात झालेली वाढ व पाणी टंचाई यामुळे या भागातील उभी पिके जळण्याच्या मार्गावर आहेत.

# बारामतीत कृषी संचालकांची शेतभेट

## सेंद्रिय शेती व एकत्रित मार्केटिंग वर भर देण्याचे आवाहन

बारामती (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती प्लॉटवरील विविध पिकांची तसेच प्रोसेसिंग युनिटची पाहणी करण्यासाठी मा. श्री. विनयकुमार आवटे, संचालक,कृषी प्रक्रिया व नियोजन,कृषी विभाग,पुणे,महाराष्ट्र राज्य हे आज त्यांच्या सहकाऱ्यांसह बारामतीत दाखल झाले.या भेटीदरम्यान त्यांनी कृषिभूषण श्री.प्रल्हाद वरे (मळद-बारामती) यांच्या शेतीला भेट देऊन प्रत्यक्ष शेती पद्धतींचा आढावा घेतला. या प्रसंगी उपविभागीय कृषि अधिकारी सौ.रश्मी जोशी,मंडळ कृषि अधिकारी श्री.महेश शिंदे, श्री. संतोष पिसे,तंत्र अधिकारी श्री.राजेंद्र डोंबाळे,सहाय्यक कृषि अधिकारी



श्री.गणेश पोंदकुले (गुणवडी),तसेच श्री.महेश तांबे, श्री.अजिंक्य वरे,श्री. सिद्धांत तावरे आदी मान्यवर उपस्थित होते.पाहणी दरम्यान सेंद्रिय व रासायनिक शेती या दोन्ही पद्धतींवर सखोल चर्चा करण्यात आली. सध्याच्या बदलत्या हवामान परिस्थितीत सेंद्रिय शेतीचे महत्त्व वाढत असून,उत्पादनासोबतच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय पद्धतींकडे वळण्याची गरज असल्याचे मा.आवटे यांनी नमूद केले.तसेच आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग (प्रोसेसिंग युनिट) आणि बाजारपेठेतील संधी यांचा योग्य वापर केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कृषिभूषण श्री.प्रल्हाद वरे यांनी आपल्या शेतीतील प्रयोग,सेंद्रिय शेतीतील यशस्वी अनुभव आणि प्रोसेसिंग युनिटमुळे मिळालेल्या आर्थिक फायद्यांविषयी माहिती दिली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनीही विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या भेटीमुळे बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची दिशा मिळाली असून,सेंद्रिय शेती व मूल्यवर्धनाच्या माध्यमातून शेती अधिक लाभदायक करण्याचा मार्ग खुला झाला आहे.याप्रसंगी मा.आवटे साहेब यांना प्रल्हाद वरे यांनी त्यांनी सुरू केलेल्या कृषी व फुड अ‍ॅग्री मॉलच्या चाललेल्या कामासंदर्भात माहीती दिली.आलेल्या सर्व मान्यवरांना शाल श्रीफळ देवून सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### कैऱ्यांनी लगडली आंब्याची झाडे

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यात सध्या आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात कैऱ्या लागल्या असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.यावर्षी हवामान अनुकूल राहिल्यास आंब्याचे उत्पादन चांगले होईल,असा अंदाज आंबा उत्पादकांनी व्यक्त केला आहे.चालू वर्षी सर्व आंब्याच्या झाडांना प्रचंड मोठ्या प्रमाणावर मोहोर लागला होता. परंतु दूषित हवामानमुळे बऱ्याचशा झाडांना मोहोर गळून गेला आहे. त्यातल्या त्यात बऱ्याच आंब्यांचा मोहोर टीकला असून त्यांना मोठ्या प्रमाणावर फळ लागली आहेत. जुन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पायरी, तोतापुरी, राजापूरी, नीलम, केसर या आंब्यांच्या झाडांची लागवड केली जाते. बऱ्याच ठिकाणी ही आंब्याची झाडे कैऱ्यांनी लगडली असली तरी एप्रिल महिन्याचा शेवटचा आठवडा आणि मे महिन्याचे पहिले पंधरा दिवस वादळी वारे आणि अवकाळी पावसाचा असतो. अशा परिस्थितीत झाडांना लागलेल्या कैऱ्यांची मोठ्या प्रमाणात पडझड होण्याची शक्यता असून कैऱ्या गळून उत्पादनात घट होऊ शकते अशी शक्यता नारायणगाव येथील प्रगतशील शेतकरी व आंबा उत्पादक राजेंद्र दिनकर पवार, सुजाता भुजबळ व राजेंद्र गायकर हे व्यक्त करत आहे.

### सासवडला हिंदू संमेलनात 800 हिंदू बांधवांची हजेरी

सासवड (दैनिक संध्या) : सासवड (ता. पुरंदर) येथील सोनोरी रोड परिसरात 'हिंदू संमेलन' रविवारी (ता.२६) उत्साहात पार पडले. या संमेलनास ७०० ते ८०० हिंदू बांधवांनी हजेरी लावली. कार्यक्रमाची सुरुवात गोमाता पूजन, भारत माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी स्वाती गोखले यांनी 'अग्निहोत्र' यज्ञाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर महिलांनी रामरक्षा व स्तोत्र पठण केले. राजलक्ष्मी काटकर यांनी नृत्यातून देवीची स्तुती सादर केली. संमेलनात मान्यवरांच्या हस्ते 'देशी वृक्षांचे रोपण' हे कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य ठरले. समाजात हिंदू धर्म संपवण्याचे कटकारस्थान काही समाजकंटक करत आहेत. गरीब कुटुंबांना आमिष दाखवून त्यांचे धर्मांतर केले जात आहे, त्यासाठी आपण जागरूक राहिले पाहिजे, असे मत सामाजिक कार्यकर्ते नीलेश धायरकर यांनी मांडले. संजय काटकर आणि प्रणव घोडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमात मोहित जोशी यांनी राष्ट्रभक्तीपर गीत सादर केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सासवड पूर्व विभागातील सकल हिंदू समाजातील हिंदुत्ववादी कार्यकर्ते व समितीच्या सेविकांनी केले होते.

### कार्यकर्ता सत्यशोधक परंपरेवर चालणारा असावा

ओतूर (दैनिक संध्या) : "सत्यशोधकांची दीडशे वर्षांची परंपरा आहे. त्यात महात्मा जोतीराव फुले हे देशातील सर्व समाजसुधारकांचे मेरुमणी आहेत. त्यामुळे चळवळ आणि कार्यकर्ता हा फुल्यांच्या सत्यशोधक परंपरेवर चालणारा असावा," असे प्रतिपादन 'अंनिस'चे अविनाश पाटील यांनी केले. महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त ओतूर (ता. जुन्नर) येथील सत्यशोधक समाजातर्फे जिल्हा परिषद मुलींची शाळा नंबर २ येथे विचारवंतांच्या बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी अविनाश पाटील बोलत होते, या बैठकीसाठी छत्रपती संभाजीनगर येथून महात्मा फुले प्रतिष्ठानचे अरविंद खैरनार, भाऊसाहेब जाधव, कल्याण रंधे, राष्ट्रसेवा दलाचे माजी कार्याध्यक्ष शरद कदम, प्रा. दत्ताजीराव कदम, अर्चना ताजणे उपस्थित होते. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष नरेंद्र डुंबरे यांनी प्रतिष्ठानची ओळख, तसेच जोतीरावांच्या द्विजन्मशताब्दी निमित्त घेणार असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. सारथ्य फाउंडेशनचे कार्यकर्ते प्रमोद बोडके यांनी शाळेच्या नूतनीकरणाविषयी माहिती दिली. शाळेतील शिक्षक रवींद्र डुंबरे यांनी शाळेचा इतिहास, सुरू असलेली कामे, राबवायचे उपक्रम याविषयी माहिती दिली. श्रीकांत ढेरंगे म्हणाले, "फुले विचारात शेती, शिक्षण, पाणी, वृक्ष, महिला, मुले, वारकरी यांना महत्त्व राहीले. या विषयांना अनुसरून आगामी शंभर वर्षांचे उद्दिष्ट ठेवूनच सत्यशोधक भाऊराव कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठान कार्यरत राहणार आहे." विलास डुंबरे म्हणाले, "त्याकाळात महात्मा फुले आणि भाऊराव डुंबरे शेतीसाठी धरणांचा विचार व आराखडा मांडत होते. त्याच्याच फलस्वरुप चिल्हेवाडी व इतर धरणे प्रत्यक्षात आली." सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष खैरनार, जुन्नर तालुका वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष गंगारामबुवा डुंबरे, सत्यशोधक दत्ताजीराव जाधव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष शिरीष भोर, माजी जिल्हा परिषद सदस्य तुषार थोरात यांनी मार्गदर्शन केले.

# जुन्नर तालुक्यातील पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव, शेतकरी संकटात

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील ओतूर, नारायणगाव आळेफाटा परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होत असून, कधी कडक ऊन तर कधी ढगाळ वातावरण निर्माण होत आहे. याबदलत्या हवामानाचा मोठा फटका उन्हाळी हंगामातील भेंडी,वांगी,गवार आणि टोमॅटो यांसारख्या पिकांना बसला असून सध्या या पिकांवर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाल्याचे पाहायला मिळत आहे.



जानेवारी ते मे महिन्यादरम्यान ग्रामीण भागात यात्रा आणि लग्न सोहळ्यांची धूम असते.या काळात पालेभाज्यांसह,फळभाज्यांना मोठी मागणी असल्याने शेतकरी वर्ग लाखो रुपये खर्च करून उन्हाळी पिकांची लागवड करतो.मात्र यावर्षी फेब्रुवारीपासूनच कडक उष्णता आणि वातावरणातील लहरीपणामुळे पिके रोगाला बळी पडत आहेत. तांबेरा रोगाच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे उत्पादन घटले असून,घातलेला भांडवली खर्चही निघणे कठीण झाल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.

भेंडीच्या पिकावर लाल रंगाचा तांबेरा मोठ्या प्रमाणात पसरला असून, यामुळे झाडांची वाढ खुंटली आहे.एकीकडे बाजारात मागणी असताना दुसरीकडे हाताशी आलेले पीक निसर्गाच्या लहरीपणामुळे वाया जात असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. कृषी विभागाने याबाबत मार्गदर्शन करून उपाययोजना सुचवाव्यात, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

तसेच येडगाव,भोरवाडी, काळवाडी,पिंपळवंडी,14 नंबर, उंब्रज, पिंपरी पेंढार, बोरी, खोडद, हिवरे या भागांमध्ये सध्या टोमॅटो लागवड सुरू आहे. काही ठिकाणी नवीन बागांची बांधणी सुरू आहे. मात्र कडक उन्हामुळे टोमॅटोची फळधारणा कमी होत आहे. फुलगळही मोठ्या प्रमाणात होत आहे.रोपांवर करपा पडला आहे. काही ठिकाणी तयार झालेली फळे मऊ पडत असल्याने व्यापारी खरेदी करण्याचे टाळत आहेत. टोमॅटोला केवळ 50 ते 60 रुपये प्रति कॅरेट भाव मिळत आहेत. याशिवाय तिरंगासह इतर विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्याच्या नियंत्रणासाठी मोठा खर्च करावा लागत आहे.त्यामुळे यावर्षीचा हंगाम तोट्याचा ठरला असल्याचे शेतकरी सांगत आहे.

# पारगावच्या तीन तरुणांची ५५० किमी पंढरपूर-अक्कलकोट सायकलवारी

पारगाव (दै. संध्या)

पारगाव ता. आंबेगाव येथील माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, गणेश भागवत व भरत ढोबळे या तीन तरुणांनी श्रीक्षेत्र पंढरपूर सायकलवारी करून निरोगी जीवनाचा संदेश दिला आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे नियमित व्यायाम करणे अनेकांना शक्य होत नसताना सायकल चालविणे हा उत्तम आणि सर्वांगिण व्यायाम असल्याचे सांगत या तीन तरुणांनी मागील तीन वर्षापासुन श्रीक्षेत्र पंढरपूर सायकलवारी हि प्रेरणादायी मोहीम सुरू केली आहे. शुक्रवारी (दि. २४) पहाटे पारगाव येथील सर्व ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन विठ्ठल ढोबळे यांनी गणेश भागवत, भरत ढोबळे आणि अशोक ढोबळे या सहकाऱ्यांसह पंढरपूर सायकलवारीला सुरुवात केली. श्रीक्षेत्र आळंदी येथे जाऊन माऊलींचे दर्शन घेतले. त्यानंतर दिवे घाट, सासवड या पालखी मार्गाने ते श्रीक्षेत्र पंढरपूरकडे रवाना झाले. यापूर्वीही विठ्ठल ढोबळे यांनी दोन वेळा पंढरपूर आणि एकदा श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे सायकलने प्रवास करून आपली जिद्द आणि चिकाटी दाखवून दिली आहे.काल रविवारी सकाळी पंढरपूर येथे दर्शन घेऊन आज सोमवारी सकाळी श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे हे तिन्ही तरुणांची सायकलवारी पोहचली. या तीन दिवसात त्यांनी सायकलवरून एकूण सुमारे ५५० किलोमीटर चे अंतर पार केले आहे. विठ्ठल ढोबळे म्हणाले सायकल चालविल्याने संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो आणि आरोग्य चांगले राहते, असा त्यांचा अनुभव असल्याचे सांगितले.

# समर्थ कॉलेज, बेल्हे येथे ड्रोन वर्कशॉप व स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



बेल्हे (दै. संध्या)

बेल्हे (ता. जुन्नर) येथे समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने, नुकत्याच विद्यार्थ्यांसाठी विशेष ड्रोन वर्कशॉप व ड्रोन कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. बेल्हे येथे समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ड्रोन ट्रेनर यश गुंजाळ यांनी, विद्यार्थ्यांना ड्रोन तयार करण्यापासून ते ड्रोन यशस्वीपणे उडविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाचे सखोल प्रात्यक्षिक दाखविले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती देण्यात आली. ड्रोनची रचना,त्याचे कार्य,वापराची विविध क्षेत्रे,आधुनिक तांत्रिक बाबी तसेच भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत ड्रोनचे बेसिक कंपोनंट्स, उड्डाण नियंत्रण प्रणाली, सेन्सर्सचा वापर, सुरक्षित उड्डाण पद्धती याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले.तसेच ड्रोन तयार करणे, त्याचे प्रोग्रामिंग करणे आणि तांत्रिक अडचणी सोडविणे याबाबतही मार्गदर्शन मिळाले. कार्यशाळेनंतर आयोजित ड्रोन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध प्रकारचे ड्रोन उडवून विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक कौशल्य सादर केले.

# पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची एकी कौतुकास्पद : डॉ. गिरीश गुणे

उरण (दै. संध्या)

"संघटनेच्या माध्यमातून सगळे एकत्र आल्याने सगळ्यांचा फायदा होतो. सामाजिक गरजांबरोबरच बौद्धिक गरजही सीएमईमार्फत भागविली जात आहे. वैद्यकीय ज्ञानाबरोबरच सामाजिक भान ठेवून काम करणे, ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. संघटनेच्या सभासदावर जर दुर्दैवी प्रसंग ओढवला तर त्याला संघटनेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे आर्थिक सहकार्य केले जाते, ही बाजू जमेची आहे. त्यामुळे संघटनेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची एकी ही कौतुकास्पद आहे, असे सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे म्हणाले. पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने नवी मुंबईतील ताज विवांता हाटेल येथे रविवारी (ता. २६) शंभरावी सीएमई आयोजित करण्यात आली होत्या. त्यावेळी डॉ. गुणे बोलत होते.




या सीएमईचे उद्‌घाटन डॉ. गिरीश गुणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत, पनवेलचे महापौर नितीन पाटील, माजी महापौर जे. एम. म्हात्रे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा पवार, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी आदींच्या उपस्थितीत झाले. यावेळी शेकडो डॉक्टर उपस्थित होते. यावेळी डॉ. वसंत पाटील यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. "डॉक्टर मंडळी एकत्र येतायत, विचारांची देवाण-घेवाण करतायत आणि सामाजिक बांधिलकीही जपतायत. व्यवसाय करताना त्याला मनोरंजनाचीही जोड देतात, ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. डॉक्टरांचे जीवन कष्टमय असते. त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी असते. मी शिक्षकी पेशातून आलोय, त्यामुळे मला जाणीव आहे की आमच्यापेक्षा आपले जीवन खडतर आहे. डोळ्यांत तेल घालून काम करावे लागते. थोडीशी चूक डॉक्टरांना खूप महागात पडते. देशात वा राज्यात जेव्हा कठीण परिस्थिती उदभवते, तेव्हा डॉक्टरांचे योगदान निश्चतच वाखाणण्याजोगे असते. कोरोना काळात याची प्रचिती सर्वांना आलेली आहे," असे माजी खासदार रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना म्हणाले.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "वैद्यकीय क्षेत्रातील देव म्हणून डॉक्टर गिरीश गुणे आणि सामाजिक क्षेत्रातील आधारवड माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या उपस्थितीने आजच्या सीएमईला चार चांद लागले आहेत. त्यांची उपस्थिती संघटनेच्या बळकटीकरणाला प्रोत्साहन देणारी आहे. त्यामुळे शंभरावी सीएमई नव्या पर्वाची नांदी ठरेल. जीवनाच्या रहाटगाड्यात, ताणतणावाच्या आयुष्यात आपल्यात असंख्य गुणही आहेत, ते आपण विसरून गेलो आहोत. पण खेळ व मनोरंजनाच्या माध्यमातून डॉक्टर्स मंडळी एकत्र येऊन आयुष्याचा आनंद घेत आहेत, हे निश्चितच उल्लेखनीय आहे. आयुष्य जगणे ही कला आहे. माणूस म्हणून जगताना कर्तव्य पार पाडून सामाजिक बांधिलकी जपणे, ही काळाची गरज आहे. आपल्या ताटातील भाकरी दुसऱ्याला देणे, यात खूप मोठे सुख दडलेले आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 'नृत्यसमिधा'मधून गुरु प्रभा मराठे यांना मानवंदना; पुणेकरांनी अनुभवला भाव

पुणे (दैनिक संध्या) : घुंगरांचा तालबद्ध नाद... चेहऱ्यावरील उत्कट भावमुद्रा... कलात्मक व लयबद्ध अदाकारी... पारंपरिक वेशभूषेत कलाकारांनी साकारलेले भावविश्व... अशा मनोहारी नृत्याविष्काराची अनुभूती पुणेकरांनी घेतली. ताल, लय व भाव यांचा मोहक संगम असलेल्या 'नृत्यसमीधा'मधून नृत्यगुरू प्रभा मराठे यांना मानवंदना देण्यात आली. कथक नृत्यांगना वेदांती भागवत महाडिक यांच्या लयोम इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, कलाछाया आणि कलाधाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गोखलेनगर येथील कलाछाया सांस्कृतिक केंद्रात आयोजित नृत्यमैफलीला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. विविध नृत्यसंघांनी सादर केलेल्या रचनांमधून शास्त्रीय नृत्याच्या परंपरेचा समृद्ध वारसा उलगडला. रश्मी जंगम पांडकर व त्यांच्या ताफ्याने सादर केलेल्या नृत्याविष्कारात लयबद्धता आणि भावपूर्णता यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. मुल्ला अफसर खान व वेदांती भागवत महाडिक यांच्या नृत्यसंघांनीही विविध अंगांनी नृत्य साकारत प्रेक्षकांना भारावून टाकले. समूह नृत्यांमध्ये कलाकारांचा अचूक समन्वय, नेटक्या रचना आणि प्रभावी पदन्यास यामुळे प्रत्येक सादरीकरण उठून दिसले. 'दशावतार'सारख्या संकल्पनांमधून सादर झालेल्या नृत्यांमध्ये नाट्यमयता, ताकद आणि अध्यात्मिक भावनांचा प्रभावी आविष्कार झाला. पारंपरिक वेशभूषा, भावपूर्ण मुद्राभिनय आणि रंगमंचावरील सुसंगत प्रकाशयोजना यामुळे संपूर्ण कार्यक्रम अधिकच रंगतदार ठरला. कृष्णध्वनी, रुक्मिणी स्वयंवर, प्रतिभा, शिवशक्ती या नृत्यप्रस्तुतींनी रसिकांच्या हृदयाला स्पर्श केला. शेवटी सर्व कलाकारांनी एकत्र येत गुरू प्रभा मराठे यांच्या स्मृतींना नृत्यांजली अर्पण केली, तेव्हा संपूर्ण सभागृह भावनांनी भारून गेले.

### बारामती येथे पोस्टल पेन्शन अदालतीचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : बारामती पोस्टल विभागाअंतर्गत येणाऱ्या पोस्टल पेन्शन संदर्भातील तक्रारीचे निवारण करण्यासाठी विभागीय स्तरावर ४ मे २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता "पोस्टल पेन्शन अदालत" चे आयोजन करण्यात आले आहे. निवृत्तीवेतनधारकांच्या लाभाशी संबंधित तक्रारी, टपाल विभागाचे सेवानिवृत्त तसेच सेवेत कार्यरत असताना मृत्यू झालेले अधिकारी व कर्मचारी, टपाल विभाग, बारामती येथील निवृत्तीधारक ज्यांचे ३ महिन्याच्या आत निपटारा झालेले नाही अशा प्रकरणांवर डाक पेन्शन अदालतीमध्ये कार्यवाही केली जाणार आहे. पेन्शन अदालतमध्ये नितिगत प्रकरण अर्थात उत्तराधिकार आदी आणि निती प्रकरणांशी संबंधित तक्रारींवर कार्यवाही करण्यात येणार नाही. ज्या तक्रारींची दखल पूर्वीच्या पेन्शन अदालीद्वारे घेण्यात आलेली आहे अशा तक्रारीचा पुन्हा पेन्शन अदालतीमध्ये समावेश करता येणार नाही. याबाबत नोंद घ्यावी. पुर्वीच्या पेन्शन अदालतीमध्ये ज्या तक्रारींचे दखल घेतली गेलेली नसेल अशा प्रकारच्या तक्रारीचा यात समावेश होऊ शकेल. एका तक्रार धारकाकडून एकच तक्रार लेखी स्वरूपात येणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतनधारक विहीत प्रपत्रामध्ये आपले अर्ज अधीक्षक डाकघर, बारामती विभाग, बारामती मुख्य टपाल कार्यालय इमारत, बारामती ४१३१०२ यांच्याकडे ३० एप्रिल २०२६ अखेर पाठवावे, विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार पेन्शन अदालतीमध्ये केला जाणार नाही, अशी माहिती बारामती मंडळाचे अधीक्षक डाकघर केतन शित्रे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये माहिती दिली आहे.




### पुण्यातील गोलमेज परिषदेत समाजबांधवांचा एल्गार; 1 लाख हरकती नोंदवण्याचा संकल्प

पुणे (दैनिक संध्या) : "आरक्षणाचे उपवर्गीकरण करायचेच असेल तर ते केवळ अंदाजावर नको, तर अधिकृत लोकसंख्येच्या आधारावरच व्हावे. जोपर्यंत देशात जातीय जनगणना होत नाही, तोपर्यंत सरकारने ही प्रक्रिया थांबवावी. आंबेडकरी चळवळ कोणाच्याही आरक्षणाच्या विरोधात नाही, मात्र उपवर्गीकरणाच्या नावाखाली अनुसूचित जातींत फूट पाडण्याचे राजकीय षडयंत्र खपवून घेतले जाणार नाही," असा इशारा पुण्यात पार पडलेल्या पहिल्या ऐतिहासिक 'गोलमेज परिषदेत' देण्यात आला. महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती च्या वतीने आयोजित या परिषदेत राज्यातील पुणे, मुंबई, ठाणे, धाराशिव, नाशिक, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, रायगड आणि कोल्हापूर यांसह अनेक जिल्ह्यांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. समितीचे मुख्य संयोजक राहुल डंबाळे यांच्या वतिने माजी आमदार जयदेव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील या परिषदेत रिपब्लिकन नेते बाळासाहेब जानराव, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, भारतीय दलित कोब्राचे ॲड. भाई विवेक चव्हाण, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनावणे , शिवसेनेचे मिलिंद आहिरे, नाशिकचे नगरसेवक प्रा. कुणाल वाघ, सुवर्णा डंबाळे, किरण कांबळे, अंबादास बनसोडे, राहुल नागटिळक, राहुल जगताप भिमशक्तीचे विजय हिंगे , भिमछावाचे शाम गायकवाड यांसह अनेक विधिज्ज्ञ, विचारवंत आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# ओप्पो इंडियाने एफ ३३ सिरीज केली लॉंच

पुणे (दै. संध्या)



ओप्पो इंडियाने आज भारतात ओप्पो एफ ३३ सीरिजच्या लॉन्चची घोषणा केली, ज्यामध्ये ओप्पो एफ ३३ प्रो ५ जी आणि ओप्पो एफ ३३ ५ जी समाविष्ट आहेत. एफ ३३ सीरिज ही आजपर्यंत ओप्पोच्या एफ लाईनमधील सर्वात महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवते, ज्यात सेगमेंटमधील सर्वोत्तम ५०एमपी अल्ट्रा-वाइड सेल्फी कॅमेरा,आयपी६९के टिकाऊपणा, प्रचंड ७००० एमएएच बॅटरी, कलरओएस १६, आणि ५ जी ++ कनेक्टिव्हिटी यांचा समावेश आहे.

लॉंचबद्दल प्रतिक्रिया देताना ओप्पो इंडिया येथील कम्युनिकेशन्स प्रमुख गोल्डी पटनायक म्हणाले, "एफ सिरीजने भारताचा 'ड्युरेबल चॅम्पियन' म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे—एक असा स्मार्टफोन जो खऱ्या आयुष्यासाठी बनवलेला आहे. एफ ३३ सिरीज ही वचनबद्धता कायम ठेवते आणि त्यात १००° एफओव्ही असलेला सेगमेंटमधील सर्वोत्तम ५०एमपी अल्ट्रा-वाइड सेल्फी कॅमेरा आणि एआय इमेजिंग फीचर्सचा संच जोडून नवा मापदंड निर्माण करते.

ओप्पो च्या विद्यमान एआय फोटोग्राफी क्षमतांवर आधार घेत, ही सीरिज एआय रीकम्पोझ, एआय परफेक्ट शॉट, एआय लाईव्ह २.०,एआय बेस्ट फेस, एआय अनब्लर, एआय स्टुडीओ,एआय रिफ्लेक्शन रिमुवर आणि एआय इरेझर यांसारखी परिचित साधने देत राहते, ज्यामुळे वापरकर्त्यांना क्षण सहजपणे सुधारता, उन्नत करता आणि पुन्हा फ्रेम करता येतात. एकत्रितपणे, ही वैशिष्ट्ये एक अखंड, एआय -प्रथम संपादन अनुभव देतात जो वापरकर्त्यांना कमीत कमी प्रयत्नात शेअर-करण्यासाठी तयार परिणाम मिळविण्यास मदत करतो.

संरचनात्मक स्तरावर, एफ ३३ सिरीज ही आपल्या सेगमेंटमधील पहिली स्मार्टफोन आहे जी वन-पिस कोल्ड कार्विंग डिझाइन सादर करते, ज्यामुळे एकसंध उच्च-चमकदार कॅमेरा प्लॅटफॉर्म तयार होतो, जो मॅट सॉफ्ट-टच सभोवतालच्या भागाशी विरोधाभास निर्माण करतो, आणि हे सर्व एका सिंगल युनिबॉडी तुकड्यावर असलेल्या त्वचेसाठी अनुकूल हार्ड कोटिंगने एकत्र जोडलेले आहे.

कलरओएस १६ मध्ये ओप्पो ची एआय वैशिष्ट्ये येतात, जसे की एआय अल्ट्रा क्लीअर डॉक्यूमेंट स्कॅनर, एआय च्या मदतीने टेक्स्टची स्पष्टता वाढवून, दोष काढून टाकणे, नॉईज रिडक्शन आणि कर्व्ह करेक्शनसह एका क्लिकमध्ये डॉक्युमेंट स्कॅनिंग. एआय रेकॉर्डर आपोआप सारांश तयार करतो, एआय रायटर नोट्स आणि सोशल ॲप्समध्ये लेखनासाठी मदत करतो. गुगल जेमिनीसोबतची डीप इंटिग्रेशन नैसर्गिक भाषेतील कमांड्सद्वारे सेटिंग्ज, कॅलेंडर आणि क्लॉक सारख्या दैनंदिन फंक्शन्स नियंत्रित करण्यास सक्षम करते. ओलॉक हे एक फीचर आहे जे चोरीपासून संरक्षणासाठी सिस्टमला रिमोटली लॉकडाऊन करते, ज्यामुळे फोर्स्ड एक्झिट, यूएसबी डेटा चोरी, फर्मवेअर फ्लॅशिंग रोखले जाते आणि डिव्हाइस हरवल्याचे रिपोर्ट केल्यावर एनएफसी निष्क्रिय करते.

या मालिकेमध्ये ६.५७ इंचाचा फ्लॅट अमोलेड डिस्प्ले आहे ज्यामध्ये १२० एचझेड स्मार्ट ॲडॅप्टिव रिफ्रेश, १४०० एनआयटीएसची लोकल पीक ब्राइटनेस, ९३.५ टक्के स्क्रीन-टू-बॉडी रेशो, १.७ एमएम अल्ट्रा-थिन बेजल्स,आणि एजीसीडीटी स्टार डी+ स्क्रीन प्रोटेक्शन आहे. प्रो व्हेरिएंट तीन रंगछटांमध्ये उपलब्ध आहे: मिस्टी फॉरेस्ट, ज्यामध्ये इंडस्ट्री-फर्स्ट डायनामिक ३डी डेप्थ कोटिंग आहे, जे हालचालीसोबत दृश्य खोली बदलते; पॅंशन रेड, सुपरकार मेटल फिनिशपासून प्रेरित; आणि स्टेअरी ब्ल्यू एक खोल, चंद्रप्रकाशासारखा फिनिश जो हातात शांत आणि कालातीत भासतो. ओप्पो एफ ३३ पर्ल व्हाईट आणि फॉरेस्ट ग्रीन मध्ये उपलब्ध आहे.

·प्री-बुकिंग आणि पहिल्या दिवशी खरेदी करणाऱ्यांना बँक सवलती किंवा एक्सचेंज बोनस मिळतील, ज्यामुळे सर्व तीन मॉडेल्सवर प्रभावी किंमती कमी होतील.·१८० दिवसांचे मोफत अपघाती नुकसान संरक्षण, द्रव नुकसान संरक्षण आणि मोफत स्क्रीन नुकसान संरक्षण, ओप्पो इंडिया निवडक बँक कार्डांवर १० टक्के पर्यंत तात्काळ कॅशबॅक, ६ महिन्यांपर्यंत कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय ईएमआय सुविधा उपलब्ध, निवडक आघाडीच्या वित्तसंस्थांवर शून्य डाउन पेमेंटसह, पेपर फायनान्स ईएमआय १२ महिन्यांपर्यंत. आणि ग्राहक १० टक्के पर्यंत एक्सचेंज बोनसचा देखील लाभ घेऊ शकतात.

ओप्पो देखील ७२-महिन्यांची फ्ल्युएन्सी प्रोटेक्शन प्रणाली देते, जी सहा वर्षांपर्यंत नवीनसारखी कार्यक्षमता सुनिश्चित करते, तर आउट डोअर मोडमधील उद्योगातील पहिली क्विक स्वीच बार (ॲप हब) सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या ॲप्सना एका एकत्रित उत्पादकता हबमध्ये संकलित करते.

**किंमत आणि उपलब्धता**

ओप्पो एफ ३३ प्रो ५जी : ८ जीबी + २५६ जीबी - रु.४०,९९९ आणि ८ जीबी + १२८ जीबी रु.३७,९९९ ओप्पो एफ ३३ ५जी : ८ जीबी + २५६ जीबी रु.३७,९९९, ८ जीबी + १२८ जीबी रु.३४,९९९ आणि ६जीबी + १२८ जीबी रु.३१,९९९

## क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनच्या ब्रॅंड ॲम्बेसेडरपदी अक्षय कुमार

पुणे (दै. संध्या)



संशोधन-आधारित कृषी-आदान क्षेत्रातील आघाडीची कंपनी क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड यांनी बॉलिवूड अभिनेते अक्षय कुमार यांची ब्रॅंड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली. या निमित्ताने कंपनीने 'देशाचा शेतकरी, देशाचा खरा नायक' ही पहिली राष्ट्रीय ब्रॅंड मोहीम सुरू केली असून ती देशातील शेतकऱ्यांच्या योगदानाला आणि त्यांच्या दैनंदिन परिश्रमांना समर्पित आहे. या सहकार्याद्वारे कंपनीच्या तीन दशकांहून अधिक काळाच्या कृषी क्षेत्रातील वचनबद्धतेला आणि अक्षय कुमार यांच्या प्रभावी प्रतिमेला एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकऱ्यांशी अधिक घट्ट नाते निर्माण करत त्यांना आधुनिक शेती उपाय स्वीकारण्यास प्रोत्साहित करणे आणि नफाक्षमता वाढवणे, हे या भागीदारीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अंकुर अग्रवाल म्हणाले की , "अक्षय कुमार जिद्द, शिस्त आणि उद्देशपूर्ण दृष्टिकोनाचे प्रतीक आहेत. ही भागीदारी म्हणजे देशाच्या अन्नदात्यांशी शेतकऱ्यांशी एक राष्ट्रीय आयकॉन जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे." ही मोहीम दूरदर्शन, डिजिटल माध्यमे आणि प्रत्यक्ष शेतकरी सहभाग कार्यक्रमांद्वारे राबविण्यात येणार आहे. तसेच पिकसंरक्षण उपाय, बियाणे आणि 'क्रिस्टल डॉक्टर' नेटवर्कद्वारे कृषी सल्ला देत कंपनी शेतकऱ्यांचा विश्वासू भागीदार म्हणून भूमिका मजबूत करणार आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या वागणुकीमुळे जागतिक तणाव वाढला

मुंबई (दै. संध्या)



जागतिक राजकारणात सध्या तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून त्यामागे मोठ्या प्रमाणावर डोनाल्ड यांच्या निर्णयशैलीचा आणि वक्तव्यांचा परिणाम दिसून येत आहे. त्यांच्या आक्रमक आणि विसंगत भूमिकेमुळे जगभरात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी भावना अनेक स्तरांतून व्यक्त होत आहे.

अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात वाढत चाललेला संघर्ष, तसेच पश्चिम आशियात निर्माण झालेली भीतीची परिस्थिती यामुळे तिसऱ्या महायुद्धाची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी केलेली काही वक्तव्ये आणि घेतलेले निर्णय यामुळे परिस्थिती आणखी चिघळल्याचे दिसते.

अमेरिकेतील एका रेडिओ भाष्यकाराच्या भारत आणि चीनविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा संदर्भ देणारा ध्वनिचित्रफीत त्यांनी पुढे प्रसारित केल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर नाराजी व्यक्त झाली. भारतासारख्या देशाचा अवमान करणारे शब्दप्रयोग झाल्यानंतर त्यांनी स्पष्टीकरण देत भारत महान देश असल्याचे म्हटले; मात्र या बदलत्या भूमिकेमुळे त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शांतता चर्चेच्या प्रयत्नांदरम्यानही ट्रम्प यांनी इराणविरोधात कठोर भूमिका घेत धमक्यांचा सूर कायम ठेवला. परिणामी, शांतता चर्चेची दुसरी फेरी निष्फळ ठरल्याचे चित्र दिसते. एका बाजूला चर्चा आणि दुसऱ्या बाजूला युद्धसदृश तयारी, या परस्परविरोधी धोरणांमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे.

पश्चिम आशियात अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात केले असून युद्धनौकांची उपस्थिती वाढवली आहे. या हालचालींमुळे तणाव वाढण्याची शक्यता अधिक बळावली आहे. जागतिक व्यापारासाठी महत्त्वाची असलेली होर्मुझ सामुद्रधुनी सध्या संवेदनशील बनली असून, तेथील परिस्थितीचा परिणाम अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर होत आहे.

जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयमित आणि सुसंगत धोरण आवश्यक असताना, वारंवार बदलणारी भूमिका आणि कठोर वक्तव्ये यामुळे तणाव वाढत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे.

आजच्या घडीला जगाला स्थैर्य आणि समन्वयाची गरज आहे. अशा वेळी कोणत्याही महासत्तेच्या नेतृत्वाकडून जबाबदारीने वागण्याची अपेक्षा असते. अन्यथा, त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागू शकतात.

## महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटना आक्रमक पवित्र्यात,राजश्रीवर विक्रेत्यांचे उग्र आंदोलन

**राज्यभरात आता ऑनलाईन**

मुंबई (दै. संध्या)

लॉटरी व्यवसायात अस्थिरता आणणाऱ्या ' बुक माय राजश्री ' ने विक्रेता, वितरक आणि राज्य सरकारची दिशाभूल केली असून न्याय हक्कांसाठी आता विक्रेते रस्त्यावर उतरले आहेत. येत्या आठवड्याभरात ' राजश्री ' लॉटरी वर बंदी शिवाय पर्याय नाही ! ,असे लॉटरी विक्रेत्यांचे नेते विलास कृ. सातार्डेकर यांनी विक्रेत्यांच्या आंदोलनात सांगितले.

राजश्री पेपर लॉटरी आडून ' बुक माय राजश्री या ऑनलाईन लॉटरीची यंत्रणा बेकायदा चालविणाऱ्या सेरेनिटी ट्रेडर्स कंपनीने येत्या आठवडयात हा प्रकार बंद करावा अन्यथा उभ्या महाराष्ट्रभरात राजश्री पेपर लॉटरीवर लॉटरी विक्रेते हे 'विक्री बंद'चे हत्यार उचलून बहिष्कार घालतील, असा सज्जड इशारा लॉटरी विक्रेत्यांचे तडफदार नेते श्री. विलास कृ.सातार्डेकर यांनी दिला .विक्रेते, वितरक यांच्या न्याय हक्कांसाठी आता आंदोलन अधिक उग्र करण्याचाही मनोदय त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र लॉटरी विक्रेता संघटनेने शुक्रवारी सकाळी विक्रोळी येथील सेरेनिटी ट्रेडर्स या कंपनीच्या कार्यालयात धडक दिली आणि 'बुक माय राजश्री 'चे कामकाज बंद पाडले. मुंबई शहर आणि उपनगरातील हजारो लॉटरी विक्रेत्यांनी घोषणांनी सारा परिसर दुमदुमून टाकला . राज्य लॉटरी आमच्या हक्कांची; नाही ' राजश्री' च्या बापाची! असा दणका दिला.यात अंध,अपंग, विधवा, वयोवृद्ध, बेरोजगार, महिला यांनी ऑनलाईन राजश्री लॉटरीच्या निषेधाने फलकही फडकावला ! यावेळी संघटनेचे संस्थापक / अध्यक्ष सातार्डेकर यांनी विक्रेत्यांच्या उग्र भावना मांडल्या आणि कंपनीला जाब विचारला.




ऑनलाईन राजश्रीची विक्री करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केवळ टोलवा टोलवीची उत्तरे दिली. सारं काही कायदेशीर चालू आहे,असे प्रियेश शाह,जयेश माणिक,मयूर लखानी,शरद जाधव यांनी कंपनीतर्फे शिष्टमंडळाला सांगितले . गेली अनेक महिने पत्रव्यवहार व प्रत्यक्ष भेटीतून कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही .त्यात अजून दिरंगाई ही संतापजनक आहे ! असेही सातार्डेकर यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

प्रामाणिकपणे राज्य लॉटरी विकणाऱ्या लॉटरी विक्रेत्यांची विक्री ही दिवसें दिवस मंदातली आहे. 'राजश्री ऑनलाईन ' मूळे कंपनी आणि ग्राहक यांच्या हातातच आता सारं काही उरलय. यात विक्रेते, वितरक हे दुर्लक्षित झालेत.बेकारीचे संकट यामुळे लॉटरी विक्रेत्यांपूढे उभे ठाकलय! असे संघटनेचे कार्यध्यक्ष सुमित सातार्डेकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

विक्रोळी येथील राजश्री लॉटरी कार्यालयावर दिवसभर चाललेल्या या आंदोलनात प्रभारी सरचिटणीस कमलेश विश्वकर्मा, उपाध्यक्ष संजय नारीग्रेकर,अशोक नलावडे,मुंबई अध्यक्ष विनोद गाडेकर,सचिव संजय शेट्ये आणि पदाधिकारी विद्याधर गायकवाड, सूर्यकांत ( बाबू ) धावले, उदय चेऊलकर, महेश कोळी, गणेश खैरे, ऋत्विका बोरकर, संभाजी डोंगरे, भिकाजी हांडे, जगन्नाथ परब, शांताराम पाटील, विष्णू पाटील, ॲड. दिग्विजय राणे हे उपस्थित होते राजश्री चे कामकाज निदर्शक विक्रेत्यांनी पूर्णपणे बंद पाडले.

## पेडिग्री® ब्रॅंडचा नवा कॅम्पेन : क्रिकेटपटू जेमिमा रोड्रिग्स बनली ब्रॅंड फेस

मुंबई (दै. संध्या)




मार्स इनकॉर्पोरेटेड ने आज भारतातील PEDIGREE® ब्रॅंडसाठी एक नवीन डिजिटल-फर्स्ट कॅम्पेन लॉन्च केल्याची घोषणा केली, जो भारतीय क्रिकेटपटू आणि पेट पेरेंट जेमिमा रोड्रिग्स हिच्या सहकार्याने साकारण्यात आला आहे. हा कॅम्पेन आधुनिक पेट-पेरेंटिंगच्या बदलत्या वास्तवावर आधारित आहे, जो अधिक माहितीपूर्ण, पोषण-आधारित फीडिंगकडे वळण्यास प्रोत्साहित करतो, त्याच वेळी पाळीव प्राण्यांना आवडणाऱ्या गोष्टींमध्ये—चव—कोणतीही तडजोड न करता. 8 चिकन लिव्हर्सच्या प्रोटीन[1] इतका प्रोटीन, तसेच 100% संपूर्ण आणि संतुलित पोषणासह, शिफारसीनुसार दिल्यास, PEDIGREE® ग्रेव्ही पाळीव प्राण्यांसाठी एक स्वादिष्ट आणि पौष्टिक पर्याय आहे. एक समर्पित पेट पेरेंट आणि भारतातील एक प्रमुख युवा क्रीडा व्यक्तिमत्त्व म्हणून, जेमिमा तिच्या शिस्त, ऊर्जा आणि परफॉर्मन्स-केंद्रित दृष्टिकोनासाठी ओळखली जाते. ती या कॅम्पेनला आपला प्रभावी आवाज देते—फक्त एक क्रिकेटपटू म्हणून नव्हे, तर एक पेट पेरेंट म्हणूनही, जी पाळीव प्राण्यांसाठी योग्य आहार निवडीचे महत्त्व समजते. PEDIGREE® ग्रेव्हीला एक रोजच्या वापरासाठी फीडिंग सोल्यूशन म्हणून मांडले गेले आहे, ज्याला वॉल्थम पेटकेअर सायन्स इन्स्टिट्यूट चा पाठिंबा आहे. हे भारतातील वेट फूड श्रेणीमध्ये मार्स पेट न्यूट्रिशन च्या नेतृत्वाला दर्शवते. जागतिक पोषण संशोधनाच्या अनेक दशकांच्या अनुभवाला स्थानिक आहार पद्धतींशी सुसंगत अशा फॉरमॅट्ससोबत एकत्रित करून, या ब्रॅंडने संतुलित पोषण अधिक सहज बनवण्यात आणि घरगुती अन्नाला पूरक म्हणून सादर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

हा कॅम्पेन क्रिकेट-थीम असलेल्या फिल्म्सद्वारे हे सजीव करतो, ज्यामध्ये जेमिमा रोड्रिग्स दिसते. यात पाळीव प्राणी आणि त्यांच्या पेरेंट्समधील दैनंदिन क्षण दाखवले गेले आहेत आणि PEDIGREE® ग्रेव्ही कसे नियमित फीडिंगला आनंद आणि नातेसंबंधाच्या क्षणांमध्ये बदलू शकते हे अधोरेखित केले आहे.

आयेशा हुडा, चीफ मार्केटिंग ऑफिसर ,मार्स पेट न्यूट्रिशन इंडिया,म्हणाल्या, "एक अग्रणी म्हणून, मार्स पेट न्यूट्रिशन ने भारतात ग्रेव्ही श्रेणी निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. वॉल्थम पेटकेअर सायन्स इन्स्टिट्यूट च्या अनेक दशकांच्या संशोधनाच्या पाठबळावर, आम्ही वेट फूडला एक संपूर्ण पोषण पर्याय म्हणून समज विकसित करण्यात मदत केली आहे, जो परिचित आहार पद्धतींशी सुसंगत आहे। त्या पुढे म्हणाल्या, "जरी पेट पेरेंट्सचा दृष्टिकोन बदलत असला तरी, दैनंदिन आहार पद्धतींमध्ये अजूनही एक अंतर आहे, विशेषतः घरगुती अन्नावर अधिक अवलंबून राहण्यामुळे, जे पाळीव प्राण्यांच्या पोषण गरजा पूर्ण करू शकत नाही।.

## एअरटेलद्वारा आपल्या नेटवर्कचा विस्तार

पुणे (दै. संध्या)




भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदाता कंपन्यांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आज घोषणा केली की, मागील 12 महिन्यांत महाराष्ट्र आणि गोव्यात 3,400 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारण्यात आल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांना अधिक वेगवान इंटरनेट, व्यापक कव्हरेज आणि सुधारित नेटवर्क अनुभव मिळत आहे.

"महाराष्ट्र आणि गोव्यात डेटा वापराची मागणी वेगाने वाढत आहे, आणि आमचे उद्दिष्ट या मागणीपेक्षा पुढे राहण्यासाठी सतत आमचे नेटवर्क अधिक मजबूत करणे आहे. 3,400 हून अधिक नवीन 5G साइट्स जोडल्यामुळे आम्ही 2.2 कोटीहून अधिक ग्राहकांना अधिक वेगवान स्पीड, व्यापक कव्हरेज आणि अधिक विश्वासार्ह अनुभव देत आहोत. विशेषतः विकासशील जिल्ह्यांमध्ये आमची सातत्यपूर्ण गुंतवणूक, कनेक्टिव्हिटीतील कमतरता दूर करून भविष्याभिमुख नेटवर्कच्या माध्यमातून प्रदेशाच्या डिजिटल विकासाला बळकटी देण्याच्या एअरटेलच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे," असे रबी शंकर मिश्रा, सीईओ, महाराष्ट्र व गोवा, भारती एअरटेल यांनी सांगितले. याशिवाय, महाराष्ट्र आणि गोव्यातील ग्राहकांना अखंड डिजिटल उपलब्धता प्रदान करण्यासाठी एअरटेल आता आपल्या ₹399 रिचार्ज पॅकमध्ये स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी पूर्णपणे अनलिमिटेड डेटा प्लॅन उपलब्ध करून देत आहे, जो डेटा मर्यादेची चिंता न करता स्ट्रीमिंग, शिक्षण, काम आणि संपर्कात राहण्यासाठी तयार करण्यात आला आहे. ग्रामीण आणि अर्ध-शहरी भाग, महामार्ग, सीमावर्ती क्षेत्रे तसेच प्रमुख आर्थिक आणि सांस्कृतिक कॉरिडॉरमध्ये नेटवर्कची घनता वाढवण्यासाठी सातत्याने गुंतवणूक करत, एअरटेल उच्च गतिशीलता आणि जास्त वापर असलेल्या क्षेत्रांमध्येही मजबूत आणि भविष्यसिद्ध कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## पुरंदरचा क्रांतिकारी इतिहास येणार रुपेरी पडद्यावर; चित्रपट व पुस्तकाची निर्मिती होणार

सासवड (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राची बारडोली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सासवड आणि पुरंदरच्या मातीतील इतिहास आता चित्रपट आणि पुस्तकाच्या माध्यमातून जगासमोर येणार आहे. सासवडचे सुपुत्र आणि चित्रपट कला दिग्दर्शक संदीप इनामके यांनी या ऐतिहासिक वारशाचे दस्तऐवजीकरण करण्याचा संकल्प सोडला असून, त्यानिमित्त नुकतीच सासवड येथील राम बागेत स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांची विशेष बैठक संपन्न झाली. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत सासवड-पुरंदरमधील सामान्य नागरिक, महिला आणि तरुणांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. हा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी संदीप इनामके आणि त्यांच्या पत्नी नवनी इनामके यांनी पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सासवडमधील क्रांतिकारकांच्या जीवनगाथांना चित्रपट आणि साहित्याच्या माध्यमातून उजाळा दिला जाणार आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी समाजवादी नेते रावसाहेब पवार तर विधीतज्ज्ञ अण्णासाहेब खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अभिनेते व दिग्दर्शक डॉ. सुधीर निकम यांनी या विषयाच्या कलात्मक पैलूंवर प्रकाश टाकला. याप्रसंगी भिकूतात्या जगताप, प्रेमाताई कंठक, आनंदमामा जगताप, निवृत्ती इनामके यांसारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांनी आपल्याकडील जुने दस्तऐवज, ताम्रपत्रे, रोजनिशी आणि दुर्मिळ छायाचित्रे सादर केली. सुमारे चार तास चाललेल्या या चर्चेत इतिहासातील अनेक अज्ञात पैलू समोर आले. कार्यक्रमाचे आयोजन संदीप इनामके स्टुडिओच्या वतीने करण्यात आले होते. गांधीजींचे 'सत्याचे प्रयोग' हे पुस्तक आणि गुलाबपुष्प देऊन उपस्थित वारसांचा सन्मान करण्यात आला.



## मंगलाष्टकांच्या सुरावटींमध्ये रंगला दृष्टीहीन वरदान-शामल यांचा विवाह सोहळा

■ सेवा मित्र मंडळ आणि लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्था यांच्या सहकार्याने आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : बॅण्डबाजासह निघालेली वरात...ढोल-ताशांच्या गजरात आनंदाने थिरकणारे गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते... स्वयंपाकघरातील भांड्यांपासून ते घरसंसारात लागणाऱ्या साहित्यापर्यंत सजलेले रुखवत...प्रत्येक क्षणी साथ देणारे, आणि आपलेपण जपणाऱ्यांच्या उपस्थितीत मंगलाष्टकांच्या सुरात दृष्टिहीन असणारे वरदान आणि शामल यांचा विवाह सोहळा रंगला. सेवा मित्र मंडळ आणि लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्था यांच्या सहकार्याने दृष्टीहीन जोडप्यांच्या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विवाह सोहळ्याचे आयोजन शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ चौकात करण्यात आले होते. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे महामंत्री राजेश पांडे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, नगरसेवक सुनील पांडे, स्वप्नाली पंडित, डॉ.मिलिंद भोई, ॲड. प्रताप परदेशी, आनंद सराफ, विश्वास भोर, राजाभाऊ कदम, दीपक वनारसे, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, मंडळाचे अध्यक्ष नितीन होले, अमर लांडे, विक्रांत मोहिते, उमेश कांबळे, सचिन ससाने, प्रशांत मते, यावेळी उपस्थित होते. सिद्धार्थ शहा त्यांनी सोन्याचे मंगळसूत्र दिले. कन्यादान सतीश व सुनेत्रा राचेल्ला यांनी केले. वधू शामल महादेव थेंडे ही कोथरूड अंधशाळेची विद्यार्थिनी असून वर वरदान सिंह हरजीत सिंह भादा हा कोरेगाव पार्क मधील शाळेचा विद्यार्थी आहे. दोघांचीही शाळेच्या स्पर्धेदरम्यान ओळख झाली. वरदान याचा मोबाईल ॲक्सेसरीज चा व्यवसाय आहे तर शामल ही जेजुरी मधील पेन्सिल पॅकेज कंपनीमध्ये काम करते. तसेच ती बास्केट, हॅन्डमेड प्रोडक्ट बनवते आणि प्रदर्शनात त्याची विक्री करते. दोघांचीही स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू आहे. शिरीष मोहिते म्हणाले, दृष्टीहीन बांधवांनाही आयुष्यातील प्रत्येक आनंदाचा क्षण अनुभवता यावा, हा आमचा प्रयत्न आहे. या विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून केवळ दोन व्यक्तींचे नव्हे, तर दोन कुटुंबांचे, दोन आयुष्यांचे सुंदर रेशीमबंध जुळत आहेत. लग्न सोहळ्याचे यंदा १२ वे वर्ष आहे. १९ दिव्यांग जोडप्यांचे विवाह या उपक्रमाच्या माध्यमातून झाले आहेत.

# बेलसर येथे भीषण दुर्घटना

जेजुरी (दै. संध्या)

■ दूषित पाण्याच्या टाकीत गुदमरून तिघांचा मृत्यू

■ तिघे मयत उत्तर प्रदेशातील कामगार



पुरंदर तालुक्यातील बेलसर जवळील चोपण वस्ती परिसरातील एका मशरूम तयार करणाऱ्या कंपनीत हृदयद्रावक दुर्घटना घडली. दूषित पाण्याच्या टाकीची साफसफाई करताना विषारी वायूचा फटका बसून तसेच पाण्याच्या टाकीत बुडून तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेत पिंटू राजेश प्रसाद वय 23 रा खोराराम उत्तर प्रदेश,व्यास सोहन कुमार वय 22 रा नवंतम,उत्तर प्रदेश,आणि गौतम यमसुख कुशवाह वय 36 रा मेदणपुर उत्तर प्रदेश यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की बेलसर जवळील चोपण वस्ती येथे वाडा ॲग्रो मशरूम कंपनी आहे. या कंपनीत 35 कामगार करीत आहेत. मशरूम तयार करण्यासाठी गव्हाचा भुसा वापरला जातो. या भूषावर पाणी मारले जाते. उर्वरित पाणी एका टाकीत जमा होते.दहा ते पंधरा दिवसांनी या टाकीची स्वच्छता केली जाते.

रविवार दिनांक 26 रोजी दुपारी साडे तीन वाजता पिंटू प्रसाद हा कामगार ही टाकी स्वच्छ करण्यासाठी कंपनी परिसरातील सुमारे ५ बाय ५ फूट आकाराच्या टाकीत उतरला. मात्र टाकीमध्ये साचलेल्या विषारी वायूमुळे काही क्षणांतच त्याचा श्वास गुदमरू लागला. त्याला वाचवण्यासाठी दुसरा कामगार व्यास कुमार तत्काळ टाकीत उतरला, पण दुर्दैवाने त्याचाही श्वास गुदमरला.

दोघांना बाहेर काढण्यासाठी ठेकेदार गौतम कुशवाह स्वतः टाकीत उतरला. मात्र टाकीतील घातक वायूचा फटका त्यालाही बसला आणि काही क्षणांतच तिघेही बेशुद्ध पडले. व पाण्याच्या टाकीत बुडाले, जेसीबी च्या साहाय्याने ही पाण्याची टाकी फोडून तिघांना बाहेर काढण्यात आले. व तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच या तिघांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले अशी फिर्याद कंपनीचे ग्रॉअर प्रदीप गोटे यांनी दिली.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे तपास करीत आहेत.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन येथील संविधान ग्रुपच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी गावात सामाजिक ऐक्य आणि उत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले. जयंतीनिमित्त सर्व महापुरुषांच्या प्रतिमांसह भव्य दिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ही मिरवणूक सटवाई चौकातून सुरू होऊन तळवाडी, आश्रम रोड मार्गे पुन्हा सटवाई चौकात विसर्जित झाली. मिरवणुकीत आकर्षक सजावट, तसेच विद्युत रोषणाईमुळे परिसर दिमाखात उजळून निघाला होता.

मिरवणुकीत तरुणाईसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. "जय भीम"च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. अनेकांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करून



सामाजिक एकतेचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी उरुळी कांचन पोलीस स्टेशनकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल खोमणे व पोलीस स्टाफ यांनी दक्षता घेतली. त्यामुळे मिरवणूक शांततेत व सुरळीत पार पडली.

या उत्सवामुळे उरुळी कांचन परिसरात सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचे दर्शन घडले असून, संविधान मूल्यांप्रती निष्ठा दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

## चाकण येथील संग्राम दुर्ग किल्ल्यात रविवार पासून शिवसंस्कार शिबिर

चाकण (दै. संध्या)

मुला मुलींना स्वसंरक्षण सक्षम बनवणे व निर्व्यसनी जीवन चारित्र्य निर्माण करण्यासाठी चाकण येथील संग्राम दुर्ग किल्ल्यात रविवार (दि.३ मे) ते रविवार (दि.१० मे,२०२६) या सलग आठ दिवसांच्या कालावधीत शिव संस्कार शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे संस्थापक - अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी दिली. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने वरील नियोजित कालावधीत सकाळी सहा ते साडे आठ व सायंकाळी सव्वा पाच ते सव्वा सात या वेळात या शिव संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मुला मुलींना स्वसंरक्षण सक्षम बनवणे, साहसी व निर्भीड वृत्ती निर्माण करणे, मुला मुलींना शारीरिक, मानसिक दृष्ट्या सक्षम करणे, स्वयंशिस्त व व्यायामाची सवय लावणे, भारतीय हिंदू संस्कृती, परंपरा, देव, देश, धर्म यांचे संस्कार करणे, योग्य दिनचर्या, निर्व्यसनी जीवन चारित्र्य निर्माण करणे ही या शिबिराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. समारोपाच्या दिवशी दुर्ग अभ्यास सहलीचे नियोजन करण्यात आले आहे. या दुर्ग अभ्यास सहलीमध्ये योगासन, प्राणायम, ध्यानधारणा, शिवकालीन युद्ध कला, भारतीय मर्दानी खेळ, लेझीम व शिव संस्कार कथेचे नियोजन केले आहे.

## विशेष प्रशिक्षण : सायबर गुन्ह्यांविरुद्ध पोलीस यंत्रणा अलर्ट

चाकण (दै. संध्या)

डिजिटल युगात वाढत्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची आर्थिक फसवणूक रोखणे हे मोठे आव्हान ठरत आहे. विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीमुळे अनेक नागरिकांचे नुकसान होत असून याला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन अलर्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर सिकॉप आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर क्राइम इन्व्हेस्टिगेशन या विषयावर डिप्लोमा अभ्यासक्रम राबविण्यात आला. या अभ्यासक्रमाची पहिली बॅच यशस्वीरित्या पूर्ण झाली असून, त्यात अनेक पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सक्रिय सहभाग घेतला. या प्रशिक्षणाला सायबर



क्षेत्रातील अनुभवी मार्गदर्शक, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच सिकॉपचे संचालक सुनील पवार यांचे मार्गदर्शन लाभले. सायबर गुन्हे तपास, डिजिटल पुरावे संकलन तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याबाबत त्यांचा सखोल अभ्यास असून त्यांनी या विषयावर अनेक पुस्तकेही लिहिली आहेत. महाराष्ट्रभर त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रशिक्षण उपक्रम राबवले जात आहेत. चाकण पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल महेश कोळी यांनी ८६ टक्के गुण मिळवत, तर पोलीस कॉन्स्टेबल महादेव बिक्कड यांनी ९६.८४ टक्के गुणांसह उल्लेखनीय यश संपादन करत डिप्लोमा पूर्ण केला. त्यांच्या या यशाबद्दल पोलीस ठाण्यात त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

> "डिप्लोमा अभ्यासक्रमामुळे केवळ पोलीस दलच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांनाही मोठा फायदा होणार आहे. सायबर गुन्ह्यांची संख्या वाढत असताना नागरिकांना सतर्कता, सुरक्षितता आणि योग्य माहिती मिळणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशिक्षित अधिकारी नागरिकांना मार्गदर्शन करून फसवणूक टाळण्यास मदत करतील."
> **- सुनील पवार, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त**

## सासवडचे तापमान रोखण्यासाठी 'बांबू बेट' मोहीम

सासवड (दै. संध्या)

थंड हवेचे शहर म्हणून ओळख असलेल्या सासवडचा पारा यावर्षी ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. या वाढत्या उष्णतेवर मात करण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी 'कऱ्हा पुत्र नदी संवर्धन समितीच्या वतीने कऱ्हा नदीकाठी 'बांबू बेट' पुनरुज्जीवन मोहीम राबवण्यात येणार आहे. पूर्वी कऱ्हा नदीच्या दोन्ही पात्रांच्या कडेला बांबूची दाट नैसर्गिक बेटे होती. ही बेटे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासोबतच पाण्याचे बाष्पीभवन रोखण्यास मदत करत असत. मात्र, काळाच्या ओघात ही वृक्षसंपदा नष्ट झाल्यामुळे सासवडच्या तापमानात विक्रमी वाढ झाली आहे. बांबूची झाडे इतर झाडांच्या तुलनेत ३५ टक्के अधिक ऑक्सिजन देतात, हे लक्षात घेऊन समितीने पुन्हा एकदा नदीकाठी बांबू लागवडीचा निर्धार केला आहे. या संदर्भात माहिती देताना समितीचे संस्थापक अमित पवार म्हणाले की, "सासवडचे तापमान ४० अंशांपर्यंत जाणे ही धोक्याची घंटा आहे. पूर्वी निसर्गानेच आपल्याला बांबूच्या रूपाने दिलेले संरक्षण आपण गमावले आहे. बांबू लागवडीमुळे नदीपात्रात पाणी टिकेल आणि शहराचा थंडावा पुन्हा मिळवण्यास मदत होईल."



कऱ्हा पुत्र समितीचा पुढाकार

समितीच्या वतीने लवकरच नदीपात्राची पाहणी करून लागवड सुरू करण्यात येणार असून, या पर्यावरणपूरक मोहिमेत सासवडमधील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, शनिवारी (ता.२५) सासवड येथील आचार्य अत्रे प्रतिष्ठानच्या वेधशाळेत ३९ . ६ अंश सेल्सिअस तापमानाच नोंद झाल्याची माहिती व्यवस्थापक नितीन यादव यांनी दिली.

## दिवसाढवळ्या घरफोड्या करणाऱ्या महिलेस अटक

चाकण (दै. संध्या)

दिवसाढवळ्या घरफोडी करून लाखो रुपयांचे दागिने लांबविणाऱ्या एका अडतीस वर्षीय महिलेस अटक करण्यात आली. खेड तालुक्यातील दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी ही कारवाई केली. महाळुंगे पोलिसांनी चोरीला गेलेले सुमारे १० तोळे सोन्याचे दागिने व अन्य मुद्देमाल असा एकूण १३ लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. सारिका संतोष भुजबळ (वय - ३८, रा. तळेगाव दाभाडे, ता. मावळ) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दाखल झाली होती. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे संशयित महिलेला शोधून काढले. अटक करण्यात आलेली महिला फिर्यादीच्या परिचयाची होती. फिर्यादीने घरी सोन्याचे दागिने कुठे ठेवले आहेत. याची तिला पूर्णपणे कल्पना होती. याचाच फायदा घेत तिने बनावट चावी तयार केली आणि फिर्यादी घरी नसताना दरवाजा उघडून कपाटातील १३ लाख ८७ हजार रुपये किमतीचे १० तोळे सोन्याचे दागिने हातचलाखीने चोरून नेले.

## मुख्यमंत्री, गडकरी व मोहन भागवत गप्प का?

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या आदेशानुसार, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अत्यंत चुकीचे वक्तव्य करणाऱ्या धिरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर बाबा याचा निषेध करण्यासाठी आणि त्यांच्यावर कडक कारवाईच्या मागणीसाठी पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे भूषण आहेत त्यांच्याबद्दल भोंदूबाबा धिरेंद्र शास्त्री अपमानकारक बोलत असताना फडणवीस, गडकरी व मोहन भागवत यांना लाज वाटायला हवी होती, त्यांनी त्याला थांबवले पाहिजे होते. भोंदूबाबा धिरेंद्र शास्त्रीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेले विधान अत्यंत आक्षेपार्ह असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत हा अशास्त्री बरळला तरीही त्यावर या तिघा नेत्यांनी साधा निषेधही नोंदवला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणे हे भाजपा आरएसएसचे राष्ट्रीय धोरण असून महाराजांचे विचार व कर्तृत्व त्यांना मान्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान महाराष्ट्र कदापी सहन करणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणे हे भाजपा आरएसएसचे राष्ट्रीय धोरण, महाराजांचे विचार व कर्तृत्व त्यांना मान्य नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत आहेत, त्यांच्या विचारांनी देशाला व महाराष्ट्राला दिशा दिली आहे. हिंदवी स्वराज्याचे विचारच संविधानातही आहेत. हाच विचार व छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व भाजपा व रा. स्व. संघाला मान्य नाही म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची सातत्याने बदनामी करणे, त्यांचा अपमान करणे व महाराजांच्या इतिहासाची विकृत मांडणी करणे हे भाजपा व रा. स्व. संघाचे राष्ट्रीय धोरण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अशी अवमानकारक वक्तव्ये करणाऱ्या लोकांवर सरकारने त्वरीत कारवाई करावी." यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या समवेत स्थायी समिती सदस्य प्रशांत जगताप, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस संजय बालगुडे, अजित दरेकर, मेहबुब नदाफ, यशराज पारखी, नगरसेविका दिपाली डोख, अश्विनी लांडगे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, संगीता पवार, प्राची दुधाणे, सीमा सावंत, अनिता धिमधिमे, प्रियंका मधाळे, ऋग्वेदिता सपकाळ, मोहसीन शेख, ॲन्थोनी जेकब, मिलिंद पोकळे, रविंद्र माझिरे, संदिप मोकाटे, मारुती माने, रवि आरडे, चेतन आगरवाल, फिरोज शेख, क्लेमेंट लाजरस, रॉबर्ट डेव्हिड, संतोष सुपेकर, चेतन पडवळ, अनिल धिमधिमे, वैभव डांगमाळी, ऋषीकेश बालगुडे, वीरेंद्र मोहिते आदी उपस्थित होते.

## पुरंदरमधील स्थानिकांना टोल माफी करण्याची मागणी

जेजुरी (दै. संध्या)

आळंदी पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील बेलसर फाटा नजिक नव्याने सुरू करण्यात आलेला टोल नाका पुरंदर तालुक्यातील नागरिकांना अन्यायकारक असून, नागरिकांचे हित लक्षात घेवून पुरंदर तालुक्यातील सर्व गावातील नागरिकांची वाहणसाठीचा टोल रद्द करावा अशी मागणी भारत सरकारचे राष्ट्रीय महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 965 हा मार्ग विकसित होत असून या मार्गावर पुरंदर तालुक्यातील बेलसर फाटा जवळ नुकताच टोल नाका सुरू करण्यात आला आहे. या टोल नाक्या मुळे येथील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, यांना प्रवास करताना अडचणी निर्माण झाल्या आहेत. पुरंदर मधील ग्रामीण भागात शेतीवर आधारित



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भाजपाचे निवेदन

उदरनिर्वाह केला जात असून शेतमाल विक्री साठी शेतकऱ्यांना या राष्ट्रीय महामार्गावरून येजा करावी लागते, तसेच औद्योगिक वसाहतीत काम करणारे कामगार, व स्थानिक नागरिकांना आर्थिक भार सोसणे शक्य नाही. पुरंदर तालुक्यातील नागरिकांच्या वाहनांना आळंदी पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील बेलसर फाटा जवळील टोल नाक्यावर टोल माफी देण्यात यावी अशी मागणी जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.